


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# अजित पवार अनंतात विलीन

## प्रचंड जनसागराच्या साक्षीने शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**बारामती : (समर्थ गांवकरी)**

लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी झालेली अलोट गर्दी, अजित दादा अमर रहे, दादा परत या... या घोषणांनी दुमदुमलेला आसमंत... अशा वातावरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी प्रचंड जनसागराच्या साक्षीने शासकीय इतमातात अंत्यसंस्कार करण्यात आले. दादांना अखेरचा निरोप देताना प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी होते आणि त्यांचे हृदय आठवणींनी दाटलेले होते.

अखेरच्या निरोपानंतरही बारामतीकरांचे पाय घराकडे परत जाण्याचे नाव घेत नव्हते. उपस्थितांचे हुंदके, मनात भावनांचा कल्लोळ, सुन्न मन प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. राजकीय नेत्यांपासून ते सामान्य व्यक्ती सर्वांनाच दादांना अखेरचा निरोप देऊन निघून जाणे अवघड झाले होते. विद्या प्रतिष्ठान मैदानासह सारे रस्ते तुडुंब भरले होते. मात्र, दादांना सोडून जाण्यासाठी कोणाचेच पाय पुढे निघत नव्हते. पार्थ आणि जय पवार हात जोडून उपस्थित समुदायाला अभिवादन करत होते.

अजित पवार यांचा बुधवारी सकाळी विमान अपघातात मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून दादांच्या चाहत्यांनी

बारामतीत एकच गर्दी केली होती. देशभरातून दादांना आदरांजली वाहण्यात आली. विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या मैदानावर शासकीय इतमामात दादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अजित पवार यांचे काका शरद पवार हताश दिसत होते. तर, अजित पवार यांच्या चुलत बहीण आणि खासदार सुप्रिया सुळे या सुनेत्रा पवार यांच्यासोबत उभ्या होत्या. अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार, चुलत बंधू अभिजित पवार यांसह कुटुंबातील इतर अंत्यविधीवेळी उपस्थित होते. सदस्य

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष नितीन नबीन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, आंध्र प्रदेशाचे मंत्री नारा लोकेश, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माणिकराव ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, प्रताप जाधव, रक्षा खडसे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गो-हे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री हसन मुश्रीफ, खासदार नीरज चंद्रशेखर, मंत्री गणेश नाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, दत्तात्रय भरणे, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, मंगलप्रसाद लोढा, संजय राठोड, आदिती तटकरे, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, प्रा. डॉ.अशोक उईके, नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, आकाश फुंडकर आदींनी अजित पवार यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील ज्येष्ठंसह सर्वसामान्य नागरिकांनीही हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काटेवाडीत अजित पवार यांच्या निवासस्थानी जाऊन पुष्पहार अर्पण केला,

अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी यावेळी मोठी गर्दी केली होती.

### बारामतीत अकरा हजारांचा फौजफाटा

पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारा दरम्यान पुणे व ग्रामीण पोलिसांकडून गुरूवारी मोठा तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच, कुठेही वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक विभागाकडूनही चोख नियोजन करण्यात आले होते. पुणे, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासह गृहरक्षक दल (होमगार्डस), राज्य राखीव पोलिस दल यांच्यासह अन्य पोलिस दलांतील तब्बल ११ हजार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. या सर्वाच्या समन्वयातून चोवीस तासांच्या आत महाराष्ट्र पोलिसांनी या प्रचंड मोठ्या बंदोबस्ताची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. पोलिस महासंचालक सदानंद दाते, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, विनयकुमार चौबे, विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्यासह अनेक वरिष्ठ पोलिस अधिकारी जातीने या संपूर्ण बंदोबस्तावर लक्ष ठेवून होते. पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे समजल्यानंतर संपूर्ण राज्यातून त्यांचे चाहते व समर्थक मोठ्या संख्येने बारामतीकडे येऊ लागले होते. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्वच पोलिस सज्ज झाले. पोलिस महासंचालक सदानंद दाते हे स्वतः या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. बारामतीमध्ये येणारे लाखो समर्थक, चाहते तसेच बहुसंख्य मान्यवर यांची येणारी वाहने, त्यांना विद्या प्रतिष्ठान येथील अंत्यसंस्काराच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी रस्ता मोकळा ठेवणे, त्याचवेळी सर्वसामान्यांना पोहोचण्यासाठी कोणताही त्रास होऊ नये, अशी सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी पोलिसांवर होती. यासाठी पुणे शहर पोलिस दलातील पोलिस आयुक्त, अपर पोलिस आयुक्त, पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त, पोलिस निरीक्षक,अंमलदार असा सुमारे ८०० जणांचा बंदोबस्त नेमण्यात आला होता. पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील पोलिस आयुक्त, २ पोलिस उपायुक्त, २ सहाय्यक पोलिस आयुक्त, १० पोलिस निरीक्षक, २३ सहाय्यक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक व अंमलदार असा ४५० जणांचा फौजफाटा नेमण्यात आला होता. याशिवाय ठाणे, नवी मुंबई, सातारा, कोल्हापूर, सांगली येथील पोलिस फौजफाटा बंदोबस्ताला मागविण्यात आला होता. याशिवाय बारामतीकडे येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर कोठेही वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी लगतच्या सर्व जिल्ह्यांमधील महामार्गावर वाहतूक विभागाकडून मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनेक पोलिस अधिकारी व पोलिस अंमलदार हे गेल्या चोवीस तासांपासून रात्रभर या बंदोबस्ताची आखणी करीत होते.



### सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा : मंत्री नरहरी झिरवाळ

अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, ही भेट नेमकी कशाबद्दल होती, याची माहिती अजून पुढे आली नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय सन्मानात अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवारी बारामतीत झालेल्या भीषण विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी बारामतीत हजारोंचा जनसागर उसळला होता. सर्वसामान्य नागरिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते. आपल्या लाडक्या 'दादा'ला अखेरचा निरोप देताना संपूर्ण बारामती भावुक झाली होती.

### अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावेत : राऊत

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच, भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले 70 हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली असली, तरी त्याचवेळी आरोप-प्रत्यारोपांचाही नवा अध्याय सुरू झाला आहे. भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध वर्तमानपत्रांमध्ये पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या. या जाहिरातींमधून अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मात्र, या जाहिरातींवरूनच आता राजकीय टीकेची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी या जाहिरातींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजपच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे.

### अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू; केंद्राकडून दखल

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे. विमान अपघात तपास ब्यूरो (AAIB) या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानंतर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिले होते. त्या पार्श्वभूमीवर या अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या पत्रावर प्रतिक्रिया देताना मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी म्हटले की, विमान अपघात ब्यूरो या संस्थेने तपास सुरू केला आहे. विमानातील ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरू केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल.







# कलेप्रती बांधिलकी मानणारा कलाकार - रघुवीर खेडकर

**डॉ. संतोष खेडलेकर**

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



रघुवीर खेडकर, मराठमोळ्या तमाशातील अतिशय लोकप्रिय सोंगाड्या. तमाशामहर्षी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुकाराम खेडकर आणि वगसम्राज्ञी कांताबाई सातारकर यांचे चिरंजीव असलेल्या रघुवीर यांचा जन्म ६ ऑगस्ट १९६१ रोजी मुंबईत झाला. मुंबईच्या हनुमान थियेटरमध्ये तुकाराम खेडकर यांच्या तमाशाचा कार्यक्रम असताना कांताबाईंच्या पोटी जन्म घेतलेल्या रघुवीर यांनी वयाच्या पाचव्या दिवशी तमाशा रंगभूमीवर प्रवेश केला. एका वगनाट्यात तान्हे बाळ म्हणून कापडाची बाहुली वापरली जायची पण थियेटरमध्येच मुक्कामाला असलेल्या कांताबाईंच्या मांडीवरच्या तान्ह्या रघुवीरला त्यादिवशी रात्री स्टेजवर नेण्यात आले.

रघुवीरच्या वयाच्या चौथ्या वर्षी तुकाराम खेडकर यांचे अकाली निधन झाले. काही कारणांनी आई कांताबाईंना तमाशातून नेसत्या कपड्यानिशी बाहेर पडावे लागले. पुढची चार पाच वर्षे कांताबाईंनी इतर तमाशात काम करून १९६९ मध्ये स्वतःचा तमाशा सुरु केला. लहानपणी रघुवीर आईसोबत फेटा घालून प्रेक्षकांना नमस्कार घालायाला स्टेजवर यायचा. वयाच्या नवव्या वर्षापासून रघुवीर खेडकर यांनी स्टेजवर येऊन चार दोन संवाद म्हणायला सुरुवात केली.

वडील तुकाराम खेडकर हे तमाशा सृष्टीतील अतिशय दिग्गज नाव. अभिनयाच्या बाबतीत त्यांचा सर्वदूर नावलौकिक. अशा परिस्थितीत आपण जर वगनाट्यात वडिलांप्रमाणे भूमिका केल्या तर लॉक नकळत आपली त्यांच्याशी तुलना करतील म्हणून रघुवीर यांनी तमाशात सोंगाड्या व्हायचं ठरवल. सत्तरच्या दशकाच्या अखेरपासून रघुवीर यांनी सोंगाड्या रंगवायला सुरुवात केली. तेव्हापासून ते आजपर्यंत ते तमाशातला सोंगाड्या रंगवीत आहेत. रघुवीर यांची खासियत म्हणजे ते स्वतः उत्तम सोंगाड्या तर आहेच परंतु ते उत्तम गायक, उत्तम नर्तक, उत्तम अभिनेता आणि कुशल समाज प्रबोधनकार देखील आहेत. तमाशाचा हंगाम नसताना उर्वरित ते गावोगाव प्रवचनाचे कार्यक्रम करतात. १९८० पासून त्यांनी त्यांची आई ज्येष्ठ तमाशा कलावंत आणि तमाशा फड मालक कांताबाई यांच्याकडून तमाशा मंडळाची संपूर्ण सूत्रे हाती घेऊन तमाशाला एक नावे रूप दिले. १९६९ ते २०१९ पर्यंत कलाकार म्हणून आजवर सुमारे अकरा हजारहुन अधिकवेळा रंगमंचावर उभे राहून आपली कला सादर करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. जसजसा काळ बदलत गेला तसे तमाशाच्या मूळ स्वरुपात बदल होत गेले. ऐंशीच्या दशकाच्या मध्यापासून टेलिव्हिजनचे युग सुरु झाले, रंगमंचीय आविष्कारात आधुनिकता आली. अनेक लोककला याच काळात लोकांना त्या कालबाह्य वाटल्या म्हणून काळाच्या उदरात गडप झाल्या. काळानुरूप बदल ही जगातल्या प्रत्येक गोष्टींसाठी आवश्यक गोष्ट आहे हे जाणून रघुवीर खेडकर यांनी तमाशातील जुन्या गोष्टींना काहीशा आधुनिकतेची जोड देऊन तमाशा रंगभूमीला उर्जितावस्थेत आणले. आज महाराष्ट्रात रघुवीर खेडकर जे जे काही करतात त्याचे अनुकरण इतर तमाशा मंडळे करतात. आज महाराष्ट्रात तमाशा कला टिकून आहे यात ज्या ज्या घटकांचा मोठा वाटा आहे त्यात रघुवीर खेडकर यांची दूरदृष्टी हेही एक महत्वाचे कारण आहे.

नागपूर येथील अक्कू यादव या गुंडाचा महिलांनी खून केल्यावर अवघ्या काही महिन्यात रघुवीर यांनी त्या घटनेवर वगनाट्य लिहून घेऊन तो वग तमाशा रंगभूमीवर आणला होता. देशाचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येनंतर त्या घटनेवर आधारित नाट्य रंगमंचावर सादर करणे अतिशय आव्हानात्मक होते. पण रघुवीर यांनी ते आव्हान पेलले आणि चक्क रंगमंचावर हवेत उडणारे हेलिकॉप्टर दाखवले. राजीव गांधी यांच्याप्रमाणे गोऱ्या रंगाचा व अस्खलित हिंदी बोलणारा पुरुष कलाकार मिळेना म्हटल्यावर त्यांनी आपली धाकटी बहिण मंदाराणी हिला राजीव गांधी यांची भूमिका दिली. या वगनाट्यात राजीव गांधी यांची हत्या स्फोटके वापरून केलेली दाखवण्यासाठी रघुवीर स्टेजवर खराखुरा स्फोट घडवून आणायचे. राजीव गांधी यांच्या भूमिकेतील मंदाराणी या छातीवर एक धातूचा पत्रा बांधून त्यावर फटाके बांधायच्या. स्टेजवर स्फोट होताच रक्ताच्या चिळकांड्या आणि नकली मांसाचे तुकडे थेट स्टेजजवळ बसलेल्या लोकांच्या अंगावर उडायचे तेव्हा प्रेक्षकही अचंबित व्हायचे. त्यांच्या या प्रयोगशीलतेला रसिकांनी त्यावेळी मोठी दाद दिली.

याच वगनाट्यादरम्यान स्टेजमागे खेळत असलेल्या रघुवीर यांच्या चार पाच वर्षांच्या भाच्याने शेकडो आपटबारांनी भरलेल्या लोखंडी पेटीचे झाकण उघडून आपटले तेव्हा प्रचंड मोठा स्फोट झाला. जवळच बसलेला एक सोंगाड्या जागीच ठार झाला, भाचा जबर जखमी झाला. अशा परिस्थितीत यात्रेत मोठा गोंधळ माजला. लोक शांत व्हावे म्हणून पुन्हा तमाशा सुरु करणे गरजेचे होते. तेव्हा आपल्या कलेवरच्या बांधिलकीला प्राधान्य देऊन रघुवीर यांनी जखमी भाच्याला आई कांताबाईसोबत दवाखान्यात पाठवून आणि स्फोटात मरण पावलेल्या आपल्या सहकलाकाचे प्रेत राहुटीत झाकून ठेऊन काही वेळात लगेच पुन्हा तमाशा सुरु केला. लोक तमाशाला आपले दुःख विसरायला येतात त्यामुळे सोंगाड्याने आपले वैयक्तिक दुःख बाजूला ठेऊन लोकांना हसवले पाहिजे या भावनेतून अगदी तरुण वयात पत्नी निधनानंतर अवघ्या पाचव्या दिवशी ते सोंगाड्या म्हणून स्टेजवर उभे राहिले होते.

## खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने लोकनेते उपमुख्यमंत्री अजित दादा यांना श्रध्दांजली अर्पण




**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. बुधवार दिनांक २८ रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुखद ,अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र राज्य हळहळला. अजित दादा पवार यांच्या आकस्मिक व दुर्दैवी निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी व धक्कादायक आहे. जनतेच्या सेवेसाठी अविरत कार्य करणारा एक कर्तव्यदक्ष, परखड आणि प्रभावी नेता आज आपल्यातून निघून गेला, ही संपूर्ण महाराष्ट्रासह विशेषता पुणे जिल्ह्यासाठी मोठी हानी आहे.या दुखद प्रसंगी खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने खेड पंचायत समिती येथील पत्रकार संघाच्या कार्यालयात शोक संवेदना व्यक्त करून लोकनेते अजितदादा यांना श्रंदाजली वाहण्यात आली.

यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष ॲड.निलेश आंधळे,सुनील थिगळे,राजेंद्र लोथे,रामचंद्र सोनवणे,महेंद्र शिंदे, नाजीम इनामदार,प्रभाकर जाधव,किरण खुडे,बाळासाहेब सांडभोर,अशोक कोरडे, उपस्थित होते.यावेळी अध्यक्ष ॲड.निलेश आंधळे,प्रभाकर जाधव,सुनील थिगळे,रामचंद्र सोनवणे,यांनी उपमुख्यमंत्री ,लोकनेते अजितदादा यांच्या आकस्मिक दुखद अपघाती निधन प्रति शोकसंवेदना व्यक्त केले.

## राजीव गांधी महाविद्यालयात विविध स्पर्धा उत्साहात संपन्न

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे मराठी विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत निबंध स्पर्धा, कविता लेखन स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धा उत्साहात पार पडल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मराठी विभागप्रमुख डॉ. माधव बसवंते व सहयोगी प्राध्यापक डॉ. संदीप कोरडे यांच्या उपस्थितीत स्पर्धांचे निकाल नुकतेच जाहीर करण्यात आले.

## स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगरेश्वर प्राथमिक शाळेने मिळविला प्रथम क्रमांक!

### नवनिर्वाचित नगराध्यक्षांच्या हस्ते मुख्याध्यापक मंगनाळे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



स्वच्छ भारत अभियान २०२५, २६ अंतर्गत कंधार नगर परिषदेच्या वतीने शहर व विविध विद्यालयांमध्ये स्वच्छ शाळा, सुंदर शहर व परिसर अभियान राबविण्यात आले होते. या स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ शाळा व स्वच्छ परिसर ठेवून नगरेश्वर प्राथमिक शाळा कंधार यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. याबद्दल कंधार नगर परिषदचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष शाहूराज नळगे यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक बी.एन. मंगनाळे यांचा प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन यथोचित गौरव करण्यात आला आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरांमध्ये स्वच्छ परिसर व सुंदर शाळा परिसर असावा, या उद्देशाने कंधार नगर परिषदच्या वतीने विविध शाळा व शहरांमध्ये स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले होते, यामध्ये स्वच्छता त्याचबरोबर अस्ताव्यस्त पडलेला ओला कचरा, सुका कचरा हा उचलून त्याचे व्यवस्थित विल्हेवाट लावून, शाळा परिसर हा दुर्गंधीमुक्त केला. या कामी नगरेश्वर प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनीही आपला सहभाग नोंदवून शाळा परिसर स्वच्छ करण्यासाठी परिश्रम घेतले होते.

स्वच्छ भारत अभियान २०२५ - २६ मध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या नगरेश्वर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बी.एन. मंगनाळे, सहशिक्षक महंमद मगदूम अब्दुल रज्जाक, कमल माहुरे मॅडम, विद्यार्थी अतिफ साजिद शेख वर्ग ७ वा, प्रेम अरविंद नवघरे वर्ग ४ था, आर्यन मंगेश कांबळे वर्ग ४ था यांचा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि.२६ जानेवारी रोजी कंधार नगर परिषदच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष शाहूराज नळगे यांचे हस्ते व मुख्याधिकारी संदीप भोळे यांचे प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह, शाल, पुष्पहार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कंधार नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अवमानकारक वक्तव्याचा किनवटमध्ये तीव्र निषेध

■ अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सौभाग्यवती सौ अमृता फडणवीस यांच्याबाबत खालच्या स्तरावर जाऊन अवमानकारक व बेताल टीका करणाऱ्या गायिका अंजली भारती हिच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ, किनवट यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट येथे सविस्तर निषेध निवेदन सादर करण्यात आले. सदर निषेध निवेदन सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोनतुला (भा. प्र. से.) यांनी स्वीकारले. यावेळी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले की, सौ अमृता फडणवीस या समाजाभिमुख व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिला असून, त्यांच्याविषयी वैयक्तिक स्वरूपाची, हीन दर्जाची व अवमानकारक भाषा वापरणे हे केवळ एका व्यक्तीचा नव्हे तर संपूर्ण महिला वर्गाचा अपमान आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात द्वेष, तेढ व असंतोष निर्माण होण्याची शक्यता असून, ही बाब कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींवर टीका करताना सुसंस्कृत भाषा, सामाजिक भान व कायदेशीर मर्यादा पाळणे आवश्यक असताना संबंधित गायिकेने या सर्व मर्यादा ओलांडल्या असल्याचा आरोप महासंघाच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित व्यक्तीविरोधात योग्य त्या कायदेशीर तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे अध्यक्ष आशिष देशपांडे, सचिव विजय जोशी, माजी अध्यक्ष प्रदीप वाकोडीकर, ज्येष्ठ साहित्यीक डॉ. मार्तंड कुलकर्णी, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद पोहरकर, माजी सचिव ॲड. कचरु जोशी, आर. डी. चौधरी व सुधाकर नेरळकर यांच्या स्वाक्षऱ्या असून ते सर्व यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सन्मानाविरोधात होणाऱ्या कोणत्याही अवमानकारक वक्तव्यांचा तीव्र निषेध व्यक्त करत, अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर निवेदनाची प्रत राज्य महिला आयोग, मुख्यमंत्री कार्यालय, गृहमंत्री तसेच विविध वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देखील पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

## अध्यक्षपदी विनोद तोरणे

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेडचे माजी जिल्हा सचिव विनोद पाटील तोरणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कंधार येथे दरवर्षीप्रमाणे १९ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या ही वर्षा हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने नुकतीच कंधार येथील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे माजी अध्यक्ष धनराज लुंगारे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या अध्यक्षपदी विनोद तोरणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

## शिर्डी येथे कै. मारुती एकनाथ फुंदे यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून भावपूर्ण श्रद्धांजली!



**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे शिर्डी शहर संपर्कप्रमुख तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे शिर्डी प्रतिनिधी श्री. राहुल मारुती फुंदे यांचे वडील कै. मारुती एकनाथ फुंदे (मारुती बाबा फुंदे) यांचे गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

या दुःखद प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शोकसंवेदना व्यक्त करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांनी कै. मारुती बाबा फुंदे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी कै. मारुती बाबा फुंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कै. मारुती एकनाथ फुंदे हे मनमिळावू, समाजाभिमुख व कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने फुंदे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पुत्र राहुल फुंदे (पत्रकार), महेश फुंदे तसेच समस्त फुंदे परिवार असा मोठा परिवार आहे.

कै. मारुती एकनाथ फुंदे यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## शिर्डी येथील कै. मारुती एकनाथ फुंदे यांचे दुःखद निधन

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



राहता तालुक्यातील शिर्डी येथील पानमळा परिसरातील रहिवासी शिर्डी संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचारी कै. मारुती एकनाथ फुंदे यांचे गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले बहीण सुना नातवंडे असा मोठा परिवार होता.. त्यांच्या निधनाने फुंदे परिवारावर शोककळा पसरली असून परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. कै. मारुती एकनाथ फुंदे हे मनमिळावू, शांत व कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. सामाजिक व कौटुंबिक आयुष्यात त्यांनी आपुलकीचे संबंध जपले होते. त्यांच्या अचानक जाण्याने नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरातील नागरिकांमध्ये शोकाची भावना आहे. त्यांच्या पश्चात पुत्र श्री. राहुल मारुती फुंदे (पत्रकार), श्री. महेश मारुती फुंदे तसेच समस्त फुंदे परिवार असा मोठा परिवार आहे. कै. मारुती एकनाथ फुंदे यांचा दशक्रिया विधी शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ०८:०० वाजता, त्यांच्या राहत्या घरी पानमळा, शिर्डी येथे होणार आहे. तसेच दिवस कार्य (तेरावा) मंगळवार दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता, राहत्या घरीच संपन्न होणार आहे. त्यांच्या अंत्यविधी समयी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दर्पण दिनानिमित्त ग्रामीण शिक्षण प्रसार मंडळातर्फे पत्रकारांचा सन्मान

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



दर्पण दिनाचे औचित्य साधून ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय पवार यांनी दि 27 रोजी मंगळवारी सायं 5 वा. पत्रकारांना त्यांच्या राहत्या घरी यथोचित सन्मान केला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड हाफिज घडीवाला होते या कौटुंबिक कार्यक्रमात संगीता ताई पवार यांच्यासह पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ संजय पवार मनोगत व्यक्त करताना वडिलांच्या आठवणी, संस्थेची वाटचाल, शिक्षण क्षेत्रातील अनुभव तसेच राजकारणाविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली.

डॉ. पवार म्हणाले की, “आजच्या या कार्यक्रमात सर्वांनी माझ्या वडिलांच्या आठवणी जागृत केल्या. त्या आठवणी माझ्यासाठी आधारस्तंभ आहेतच, पण त्या आपणा सर्वांच्या मनातही तितक्याच जिवंत आहेत, हे पाहून मन भरून आले. १४ मार्च २०११ रोजी वडिलांचे निधन झाले. त्यांच्या स्वभावामुळे कदाचित काही लोक दुखावले गेले असतील, अशी मला भीती वाटायची. मात्र त्यानंतर संस्थेतील माजी कर्मचारी निवृत्त होत असताना शैक्षणिक दाखल्यांसाठी संपर्कात आले आणि तेव्हा जाणवले की या संस्थेने हजारो लोकांचे आयुष्य घडवले आहे.”

“किमान दहा हजार कर्मचारी या संस्थेत शिक्षण घेऊन सेवेत गेले. जर त्या काळात शैक्षणिक संस्था व सुविधा उपलब्ध नसत्या, तर या लोकांचे काय झाले असते, हा विचार मनाला चटका लावून गेला. वडिलांचे मोठेपण त्यांच्या निधनानंतर अधिक ठळकपणे जाणवू लागले,” असे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या उभारणीचा प्रवास सांगताना डॉ. पवार म्हणाले, “१९६५ साली मराठवाड्यात उच्च शिक्षणाची सुविधा नव्हती. बारावीनंतर शिक्षणासाठी हैदराबादला जावे लागायचे. वडिलांनी शासकीय नोकरी न स्वीकारता शिक्षण क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला आणि त्यातूनच संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. आर्थिक अडचणी असतानाही शिक्षणाचा विस्तार करण्यावरच भर दिला.”

राजकारणाबाबत भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, “धर्म, जात, पंथ या गोष्टींवर आधारित राजकारण मला मान्य नाही. अनेकांनी मला राजकारणात येण्याचा सल्ला दिला, अपक्ष निवडणूक लढवण्याचेही सुचवले; मात्र वडिलांनी दिलेल्या संस्कारांवर कोणी बोट ठेवू नये, यासाठी मी सावध पावले टाकतो. शिक्षण क्षेत्रात काम करताना माणूस आणि त्याचे काम महत्त्वाचे असते, जात नव्हे.” पत्रकारांविषयी आदर व्यक्त करताना ते म्हणाले, “लाडका भाऊ, लाडका मामा अशा संकल्पनांप्रमाणेच शासनाने ‘लाडके पत्रकार’ अशी योजना आणली, तर ती समाजासाठी महत्त्वाची ठरेल. पत्रकार हे सुशिक्षित असतात, समाजाचे आरसे असतात. त्यांना आर्थिक व सामाजिक बळ मिळाले पाहिजे.”

कार्यक्रम हा पूर्णतः कौटुंबिक स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट करत ते म्हणाले, “आज इथे केवळ गप्पागोष्टींसाठी जमलो आहोत. कोणत्याही राजकीय पक्षाचा विचार सध्या केलेला नाही.

भविष्यात काही निर्णय घ्यायचा झाला, तर तो सर्वांशी चर्चा करूनच घेतला जाईल.” कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. पवार यांनी सर्व पत्रकारांचे आभार मानत संस्थेच्या शैक्षणिक संकुलाला भेट देण्याचे निमंत्रण दिले. यावेळी सूत्रसंचालन उत्तम चव्हाण यांनी केले तर आभार संगीता ताई पवार यांनी मानले.

# मृत्यूच्या दांडीवर लोककलेचा जीवघेणा खेळ खेळणाऱ्या रघुवीरचा पद्मश्रीने गौरव !

**विश्वास पाटील**

(समर्थ गांवकरी)



रघुभाऊ खेडकरला मिळालेल्या पद्मश्री पुरस्कारला मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे. गेले जवळपास तीनशे वर्षे माळामुरडाच्या दलित पददलित कलावंतांनी आपल्या गणागोतांसह आणि सोयऱ्यांसह पोटाला चिमटे घेऊन जी "तमाशा" नावाची लोककला जोपासली. तमाशाच्या बोर्डावरून जे अभिजात संगीत, नाट्य, विनोद आणि अभिनय अशा कलांचे बहुजनांसाठी संवर्धन केले. त्यांच्या त्या कष्टावर उमटलेली राज्यमान्यतेची मोहर म्हणजे रघुभाऊची पद्मश्री मानावी लागेल. राजीव गांधीच्या बॉम्बस्फोटातील झालेल्या मृत्यूनंतर लगेचच "राजीव गांधी हत्याकांड" या नावाचा वग रघुवीरच्या तमाशा मंडळाने बसवला होता. ज्यामध्ये लाखो रुपये खर्च करून बांधलेले हेलिकॉप्टर तारेच्या साह्याने प्रेक्षकातून स्टेजवर यायचे. बॉम्बस्फोटाची साहस दृश्य ट्रिकसिनच्या साह्याने साह्याने दाखवली जायची. रघुभाऊंची बहीण मंदा राणी या स्त्री असून राजीव गांधीचा अतिशय जबरदस्त असा पुरुषी रोल निभावून न्यायच्या. सोनिया गांधीचे काम त्यांच्याच किरकोळ बांध्याच्या अलकाताई या करायच्या. प्रचंड खर्च करून बसवलेले हे वगनाट्य तेव्हा गावखेड्यात तुफान चालले होते.

एकदा हेलिकॉप्टर उडवण्याचा स्टेजवरचा देखावा जवळ आला. तेव्हा स्टेजच्या मागे खेळत असलेल्या रघुवीरच्या सहा सात वर्षाच्या भाच्याने ( बबलूने ) चुकून कपडेपटात आपटबार ठेवलेल्या भल्या मोठ्या जड लोखंडी पेटीचे झाकण उघडले, त्याच्या लहानग्या जीवाला ते जड झाकण पेलता आले नाही. त्याच्याकडून ते झाकण धाडकन पेटीवर आदळले आणि पेटीतल्या शेकडो आपटबारचा मोठ्ठा स्फोट झाला. त्या स्फोटात स्टेजवर काम नाही म्हणून राहूटी जवळच्या शेकोटीजवळ शेकत बसलेल्या वामनमामा नावाच्या सोंगाड्याच्या कवटीचे तुकडे होऊन मेंदू बाहेर पडला. छोटा बबलू जबर जखमी झाला. रंगमंचाला अक्षरश: त्या मूळ बॉम्बस्फोटाच्या पेरेंबदूर ठिकाणाची अवकळा आली. प्रेक्षकांची दाणादाण झाली. जत्रेत गोंधळ माजला. पोलिसांच्या विनंतीवरून त्याक्षणीही रघुवीरने तशा अवस्थेत आपला खेळ सुरू ठेवला. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळीच या अपघाताचा ताण सहन न होऊन प्रक्षुद्ध झालेल्या रघुवीर नावाच्या या कलावंताने लाखो रुपये खर्च करून बनवलेले ते हेलिकॉप्टर वैफल्यग्रस्त स्थितीत एका लोखंडी पहारीने तोडून टाकले. त्यानंतर हा तुफान गर्दी खेचणारा प्रयोग डोळ्यातून वाहणारे रक्त पुसत बंद करावा लागला. पण घेतलेले कर्ज आणि त्यावरचे व्याज काही झोपले नव्हते. संपूर्ण कुटुंबावर आपल्या ट्रका आणि सामान बारदानासह सारे काही गहाण टाकून स्वतःच्याच मिळकतीवर भाड्याने जगायचे दुर्दैवी दिवस उगवले.

गेली अनेक वर्ष मी हे सगळं पाहतो आहे. महाराष्ट्रातील इतर परंपरागत ढोलकी फडापैकी रघुवीर खेडकर सह कांताबाई हा एक नामांकित फड. त्यांनी तो मोठ्या जिद्दीने, जिवाचा रक्तभात करत इथपर्यंत रेटत आणला आहे इतकेच. अन्यथा अंगात हाडामांसाशी चिकटलेला आर्थिक विवंचनेचा कॅन्सर सहन करत, जीवनाशी पैजा घेत जगणे हे काही त्यांच्यासाठी सोपे नव्हते.

पालीच्या यात्रेत दहा वर्षांपूर्वी नांगरलेल्या शेतात या फडाच्या मोटारी पार्क केल्या गेल्या होत्या. त्यावेळी मी कांताबाईंशी गोष्टी करताना, जीवनभर त्यांनी कष्टाने जो लोककलेचा रथ हाकला. तो हाकताना पदोपदी त्यांना जे कष्ट, अडवणूक, नाडवणूक, कर्जदाराकडून होणारे अपमान हे सारे आठवले असावे. कांताबाई डोळे पुसत सहज बोलून गेल्या. " साहेब यश कीर्तीचा एवढा मोठा समिंदर पार करून आले. पण गाठीला त्या दर्यातल्या पाचसहा बादल्या पण उरल्या नाहीत बघा." अन मग अचानक उमाळा फुटून त्यांच्या डोळ्यातून जशा काही धबधब्या सारख्या अश्रुधारा वाहू लागल्या.

गरिबीत जन्माला आलेल्या कांताबाईला साधे घुंगरू खरेदी करणे परवडत नव्हतं. तेव्हा बाभळीच्या वाळक्या शेंगा पायाला बांधून त्या नृत्य शिकल्या होत्या. मध्येच लोककलेच्या सिंहासनावर रंग सम्राटा सारखा बसलेला कुंकवाचा धनी तुकाराम खेडकर जग सोडून गेले. तरी त्या नेटाने उभ्या राहिल्या. सवती मत्सर म्हणजे काय याचा डागण्या देणारा अनुभव त्यांनी सोसला. कोकणामध्ये सवतीच्या दर्शना बरोबर कांताबाईंचा सुंदर चेहरा तव्यात करपलेल्या भाकरी सारखा काळा पडला. पण तरीही नटेश्वराच्या आणि रसिकजणांच्या पाठिंब्याने त्यांनी आपल्या फडाला मोठे नाव मिळवून दिले.

"विठू माझा लेकुरवाळा" अशा भूमिकेतूनच आपल्या साऱ्या बहिणींसह इतर कलावंतांचा मेळा रघुभाऊंनी सांभाळला. जीवनावर प्रचंड श्रद्धा असलेला हा रघुभाऊ नावाचा माणूस. आज इथं तर उद्या तिथं असा रोजचा प्रवास फडा बरोबर चालू पण रघुभाऊचा जो देव्हारा आणि त्यातील देवतांची संख्या लक्षात घेता एक भरलेली बैलगाडी न्यावी तसा ते आपला भव्य देव्हारा सोबत घेऊन प्रवास करतात. नुसता प्रवास नव्हे तर रोज किमान दोन अडीच तासाची श्रद्धापूर्वक पूजापाठांची ती त्यांची कडी शिस्त आजही चालू आहे. त्यांच्या भगिनी अलकाताई यांच्यासारखी प्रचंड आणि चौफेर वाचन करणारी वाचक मी पाहिली नाही.

पंचवीस वर्षा मागचा तो दिवस माझ्या जीवनातील मर्मबंधातील ठेव ठरावा असा अजून माझ्या लक्षात आहे. कांताबाई आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मुलाखतीसाठी बाळासाहेब थोरात यांनी आपल्या संगमनेर मधील साखर कारखान्याच्या पाठीमागे टेकडीवर उंचावरच आमच्यासाठी एक जुने रेस्ट हाऊस निवडले होते. सोबत दलित कवी दिनकर साळवे होता. तिथल्या भिरभिर वाऱ्यात छतावरचा पत्रा वाजत असतानाच आमचा गप्पांचा फड रंगला. काही क्षणातच मला जाणवले की, थंडी वाऱ्यातून मोठ्या कष्टाने आपल्या लेकराना बचावणाऱ्या एखाद्या गरुडाच्या मादी सारखं करारीपण आणि हिम्मत कांताबाईंच्या अंगात सळसळते आहे.

रघुची बहीण मंदाराणी. कमालीची जिद्दी. नागिनी सोबत नृत्य करायचे तिच्या मस्तकात शिरले. मग तडक फडामध्ये एका गारुड्याचे आणि जिवंत नागिणीचे आगमन झाले. मंचावर रोज रात्री मंदा आणि नागिन या दोघीही डोलू लागल्या. पण खेळ संपल्यावर रोज रात्री नव्या गावासाठी प्रवास करावा लागायचा. तेव्हा त्या नागिणीला कलाकारांच्या बसमध्ये मधल्या दांडीला गाठोड्यात घालून अलगद बांधून ठेवले जायचे. तिचे रात्रभर ठिस ठिस असे फुत्कार सुरू असायचे. त्या अंधाऱ्या भीतीमुळे सर्वच कलाकारांची वजने वेगाने खाली उतरू लागली. तेव्हा कुठे ते नृत्य थांबले.

रघुभाऊला मिळालेल्या पद्मश्री पुरस्काराच्या पार्श्वभूमीवर या कुटुंबीयाशी माझ्या जुळलेल्या स्नेहबंधाचा एक मोठा पोट माझ्या डोळ्यासमोर उभा राहतो. त्यांचे अनुभव आणि विश्व मला माझ्या "गाभूळलेल्या चंद्रबनात" या कादंबरीच्या लेखनावेळी खूप उपयोगी पडले. त्यांचा आणि आमचा फॅमिली फ्रेंड संतोष खेडलेकर आता हा आता "खेडकर" झालेला आहे. ढोलकी फडाच्या पारंपारिक मंचावर रघुवीर खेडकर यांनी एक धमाल विनोदी नट, पट्टीचा गायक आणि अष्टपैलू कलावंत आणि तमाशा निर्माता या नात्याने अनेक दशके आपले रक्त आटवले आहे. त्यांची घराण्याची पुढची पिढी मोहित अमृता आणि पूजा हे सर्वजण लोककलेचा वारसा तसाच नेटाने पुढे चालवत आहेत.

साठीच्या दशकात प्रसिद्ध दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी एका सिनेमासाठी जयश्री गडकर यांच्या ऐवजी कांताबाई सातारकर या गुणी अष्टपैलू कलावतीची निवड केली होती. त्यानंतर आमच्या पु. ल . देशपांडे यांनी लिहिलेल्या आणि ज्येष्ठ दिग्दर्शक डॉक्टर जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या "एक होता विदूषक" या सिनेमाच्या वेळी सुद्धा रघुवीर खेडकर यांना हिरोच्या भूमिकेत घ्यायचे घाटत होते. जो रोल पुढे लक्ष्मीकांत बेर्डेने केला. पण कांताबाई काय किंवा रघुवीर काय, यांना आपल्या स्वतःच्या सिनेमातल्या वैभवी यशापेक्षा फडामध्ये काम करणाऱ्या इतर शंभरभर कलावंतांचे संसार उघड्यावर टाकायचे नव्हते. त्यामुळे अशा अनेक संधी आल्या आणि गेल्या, पण खेडकर यांच्या घराण्याने कष्टकरी बहुजनांच्या मनोरंजन व प्रबोधनासाठी कष्टाचा रस्ता पकडला. पांढरपेशांच्या नजरेत बदनामीचा डाग लागलेल्या तमाशा कलेची आराधना सोडली नाही. आज एकूणच पुरस्कार रघुवीरला आणि आनंद महाराष्ट्राला असे जे झाले आहे, ते या मंडळींच्या पुण्याईचे फळ आहे. रघुच्या मातोश्री कांताबाई ह्या अजून काही वर्ष जगायला हव्या होत्या होत्या. पण तरीही आज आपल्या घराण्याच्या आड्यावर कीर्तीची पताका लागल्याने स्वर्गात सुद्धा ती माऊली आनंदाने न्हाऊन गेली असेल. तिचे कौतुक करण्यासाठी पवळाबाई, सरस्वतीबाई, विठाबाई अशा साऱ्या मावल्या गोळ्या झाल्या असतील. स्वर्गाच्या जोत्यावर बसून संगमनेरकडे बोट दाखवत त्या कांताबाईचे कौतुक करत असतील, " अग बघ कांता, आपल्या तमासगिरांच्यात पहिल्यांदाच तुझ्या रघुला पद्मश्री मिळाली. धन्य कांताबाई तुझा उंबरठा सोन्याचा झाला ग ! "

## बिलोलीत रोहयो योजने अंतर्गत बोगस वृक्ष लागवड

- हजारो वृक्षाचे रोपण, संगोपन निव्वळ कागदावरच

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



बिलोली तालुक्यात महाराष्ट्र शासनाची हरित महाराष्ट्र, समृद्ध मोहीम रोजगार हमी योजना ही ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तिक फळबाग व सार्वजनिक वृक्ष लागवड रस्त्यासह विविध ठिकाणी विविध जातीचे वृक्षारोपण व संगोपन करण्यासाठी शासनाकडून लाखो रुपये खर्च करण्यात येते. परंतु बिलोली तालुक्यात मात्र आतापर्यंत हजारो वृक्ष लागवड व संगोपन निव्वळ कागदावरच करण्यात येत असून प्रत्यक्षात पाहिल्यास त्या जाग्यावर एकही वृक्ष दिसून येत नाही, यामुळे या योजनेत मोठ्या प्रमाणात बोगसगिरी दिसून येत आहे. महाराष्ट्रात वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या मध्येमातून शेतकऱ्यांना फळबाग योजनेचा वैयक्तिक लाभ दिला जातो. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मोकळ्या जागेत,शेती बांधावर वृक्षारोपण केले जाते. विशेषत: फळबाग लागवडीसाठी फळपिके आंबा, काजू, पेरू, चिकू, सीताफळ, डाळिंब, लिंबू, नारळ, चिंच, आवळा,फणस, जांभूळ, संत्रा, मोसंबी विविध जातीत्या फळांचे रोपांपासून ते लागवडीपर्यंतच्या खर्चासाठी ३ वर्षांत १००टक्के अनुदान टप्प्याटप्प्याने दिले जाते. यांबरोबर पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षाच्छादन वाढवणे हे महाराष्ट्र शासनाची हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र मोहीम २०२५ अंतर्गत १० कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्टे पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायती, वन विभाग आणि कृषी विभागामार्फत सार्वजनिक जमिनी, रस्त्याच्या कडेला विविध जातीचे वृक्षारोपण करण्यात येते. सदरील योजना ही तालुका स्तरावरील रोहयो विभागामार्फत साह्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविली जात आहे. वरील योजनेतील वृक्षारोपण करण्यासाठी सुरुवातीला २ बाय २ याप्रमाणे खड्डे खोदून त्या खड्डयात पालापाचोळा, शेणखत, काळी माती टाकून रोपण करणे व त्या वृक्षाचे ३ वर्ष संगोपन करून त्यास जीवित ठेवणे गरजेचे आहे. अशा योजना राबविण्यासाठी शासनाकडून प्रति १ हजार वृक्षाला वर्षाकाठी ६ लक्ष तर ३ वर्षासाठी १८ लक्ष रुपये खर्च करण्यात येते. पण बिलोली रोहयो विभागात कंत्राटी बेशिक असलेल्या साह्यक कार्यक्रम अधिकारी साहेबराव सोंडारे व संबंधित अभियंता, रोजगार सेवक यांचा भोंगळ कारभार चालत असल्यामुळे तालुक्यातील बोळेगाव, सगरोळी, बिजुर,शंकरनगर, कामरसपल्ली, थडी सावळी, येसगी, शिंपाळा, हरणाळीसह अनेक भागात ही योजना निव्वळ कागदावरच राबविल्या जात आहे. प्रथम लागवडीचे कुठेतरी फोटो शेषण करून देखावा करणे मग कामावर भोगस मजूर दाखवून लाखो रुपये परस्पर हडप करण्याचा रीतसर घोटाळा चालू आहे.म्हणून या विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

देशाच्या प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे चेअरमन महेंद्र दळवी होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे मुंब्रा पोलिस ठाण्याचे ए. पी.आय वसंत खतेले, ए. पी.आय. अमोल कोळेकर आणि ए. पी.आय तोरडमल यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी शाळेच्या प्राचार्या श्रीमती ज्योत्स्ना सोनी, किरण सावंत सर , शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, समूहगायन, नृत्य, कवितावाचन व प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## कमलाकर सोनकांबळे पत्रकारिता कोर्समध्ये प्रथम क्रमांकाने उतीर्ण

**अक्कलकोट : (समर्थ गांवकरी)**



गौगांव (ता.अक्कलकोट) येथील दैनिक यश सिद्धी न्यूजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांनी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या पत्रकारिता कोर्समध्ये मध्ये ए ग्रेड पदवी घेऊन उतीर्ण झाले आहेत.त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. गोरगरीब व गरजू लोकांचे सेवा करताना कमलाकर सोनकांबळे यांना अनेक अडचणी आल्या पण खचून न जाता,समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदांत हेतू बाळगून सामाजिक कार्य निरंतर ठेवले.

सामाजिक बांधिलकी जपत सन २००० पासून वृत्तपत्रात काम सुरु केले.सुरुवातीच्या काळात दैनिक लोकमत युवामंच व दैनिक संचार मध्ये 'तरुणाई या सदरात कॉलेज जीवनात पत्रकारिता अनुभवले.

तसेच साप्ताहिक सत्यप्रिय या वृत्तपत्रात कार्यकारी संपादक व कालींगंगा या साप्ताहिक मध्ये क्राईम रिपोर्टर म्हणून काम पहिले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई,अक्कलकोट शाखेचे अध्यक्षपदी निवड झाली.आणि ते मोठी जबाबदारी स्वीकारले अध्यक्ष म्हणून काम करताना सर्वांना विश्वासात घेऊन पारदर्शक काम केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातील सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तीन वेळेस अध्यक्ष पदाची संधी मिळाली. सध्या ते दैनिक यश सिद्धी न्यूज संपादक म्हणून काम बघत आहे. त्यांनी पत्रकारिता कोर्स मध्ये ए ग्रेड घेऊन उत्तीर्ण झाले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, नवनाथ जाधव,.प्रा.डॉ.सूर्यकांत गायकवाड, सरपंच वनिता सुरवसे,प्रदीप जगताप,प्रा.सुनील गायकवाड,मधुकर सुरवसे आदी सह विविध क्षेत्रातून अभिनंदन केले व पुढील शुभेच्छा दिल्या.

## 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने सन्मानित

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



ग्रामीण भागात महिला बचत गटांना सक्रिय सहकार्य करणाऱ्या पुरुष बांधवांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बदलामध्ये योगदान देणाऱ्या पुरुषांचा सन्मान व्हावा म्हणून ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महिला आर्थिक विकास महामंडळ, ठाणे (महाराष्ट्र शासन अंगीकृत) नवतेजस्वीनी कार्यक्रम अंतर्गत भरारी लोकसंचलित साधन केंद्र पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे. यांच्या वतीने 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने पडघा परिसरातील नागरिकांना यावेळी सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील व आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते पडघे विभागातील अनेक नागरिकांना 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सी.एम. आर.सी व्यवस्थापक विद्या गायकवाड यांनी उपस्थित नागरिकांना महिला आर्थिक विकास महामंडळाची माहिती दिली. तसेच कार्यक्रम बाबत प्रस्तावना केली.

यावेळी सरपंच सायली पाटील, उपसरपंच चंदा साळुंके, पंचायत अधिकारी भास्कर घुडे, सी.एम. आर.सी व्यवस्थापक विद्या गायकवाड, सी.एम. आर.सी स्टाफ तर आदी उपस्थित होते.

## हरिनाम सप्ताहाचे आयोजन!

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत येथे गुरुवार दि. 29 जानेवारी ते गुरुवार दि. 5 फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहानिमित्त दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी नियमाचे भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरीकिर्तन व हरीजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात ह.भ.प. अथर्व भास्कर, ह.भ.प. गजानन रुपनर, ह.भ.प. गोसावी, ह.भ.प. अर्जुन शिंदे, ह.भ.प. भरत थोरात, ह.भ.प. राजेंद्र सद्गगीर, ह.भ.प. दत्तात्रय रुकारी यांची किर्तनसेवा लाभणार असून गुरुवार दि. 5 फेब्रुवारी रोजी ह.भ.प. किसन धंद्रे यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना कुंडाणे ओ. कडून भावनिक आदरांजली

**कुंडाणे ओ (कळवण) : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील कोट्यवधी जनतेच्या मनात घर करून राहिलेले, विकासाचे प्रतीक मानले जाणारे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याविषयी कुंडाणे ओ गावात अपार प्रेम आणि आदर आहे. दादांच्या नेतृत्वाखाली झालेला विकास, त्यांनी दिलेले निर्णय आणि सामान्य जनतेसाठी घेतलेली ठाम भूमिका यामुळे ते जनतेच्या मनात कायमचे स्थान मिळवून गेले आहेत. कळवण मतदारसंघाचे आमदार नितीन भाऊ पवार यांच्यावर अजितदादांचे विशेष प्रेम होते. कळवण तालुका व मतदारसंघाच्या विकासासाठी दादांनी मागील पंचवार्षिक काळात सुमारे २२०० कोटी रुपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून दिला. तसेच ओतूर, जामशेत, श्रीभुवन धरण यांसारख्या शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून तालुक्याच्या विकासाला गती दिली. याच विकासाभिमुख कार्याची आठवण म्हणून कळवण तालुक्यातील अनेक गाव खेड्यातील व्यापारी व्यवसायिक शेतकरी बांधवांनी आपली दुकाने बंद ठेवत भावनिक एकजूट दाखवली. कुंडाणे ओ गावातही ग्रामस्थांनी एकत्र येत कडकडीत बंद पाळून दादांप्रती आपली भावना व्यक्त केली. अजितदादा पवार आणि आमदार नितीन पवार यांच्यातील भावकीसारखे अतिशय घनिष्ठ संबंध असल्यामुळे अनेक वर्षांनुवर्षे प्रलंबित असलेला ओतूर धरण प्रकल्प मार्गी लागला. काही महीन्यात या धरणाचे काम पूर्ण होऊन अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते लोकार्पण होणार होते, ही बाब कुंडाणे ओतूर ,सिरसमणी,नरुळ,भुसणी, दह्याने कळवण खुर्द व आदी परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा आशेचा किरण ठरली होती, असे ग्रामपंचायत कुंडाणे ओ चे उपसरपंच रवींद्र आहेर यांनी सांगितले . दुष्काळाच्या झळा सोसलेल्या कुंडाणे,ओतूर , सिरसमणी ,भुसणी परिसरातील शेतकरी भावूक होत म्हणाले,

"आमची शेतशिवार हिरवीगार होणार होती. राजकारणात नेते अनेक होतील, पण कामाचा दादा माणूस अजितदादांसारखा होणार नाही. ओतूर धरणाला अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे," अशी मागणी स्थानिक शेतकरी, राज देवरे, भगवान देवरे, यांनी व्यक्त केली .

# विविध संघटनांच्यावतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन

**महाराष्ट्राचा लोकनेता हरपला : डॉ. रणजीत सत्रे**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्राचे लाडके नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे दुर्दैवी विमान अपघातात निधन झाले. या घटनेने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत व विकासात त्यांचे मोठे योगदान होते.

होमिओपॅथी डॉक्टरांच्या प्रश्न सोडविण्याचे त्यांनी काम केले होते. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र झटणारे असे ते व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्राचे लोकनेते हरपले. असे प्रतिपादन डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ.रणजीत सत्रे यांनी केले आहे.

ताठेमळा येथील गुरुदत्त उद्यानामध्ये अहिल्यानगर डॉक्टर सेल,भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ,संजय सत्रे नाना सोशल फाउंडेशन, सकल माळी समाजाच्या वतीने उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ.रणजित सत्रे, डॉ.योगिता सत्रे,नगरसेविका पुष्पाताई बोरुडे,वंदनाताई ताठे,वर्षाताई सानप,ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे, उपाध्यक्ष विलास ताठे,कार्याध्यक्ष संभाजी काळे,सचिव आप्पा बेद्रे, खजिनदार विश्वनाथ जाधव, डॉ.संदीप सुराणा, डॉ.चैत्राली सारडा,डॉ. ज्ञानेश्वर फुसे, डॉ.खन्ना, डॉ.किरण कर्डिले, डॉ.कारखीले, डॉ.शंकर आहुजा, सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, विशाल गणेश देवस्थानचे प्रा. माणिक विधाते,विनोद पुंड राजेंद्र पडोळे,कॅप्टन सुधीर पुंड, चंद्रकांत पुंड,अनिल इवळे, रोहित पठारे, अभिजीत बोरुडे, किरण पंधाडे, ओंकारेश्वर झावरे,रमेश चिपाडे,पोपट शिंदे,गणेश कोल्हे,संजय नाना सत्रे सोशल फाउंडेशनचे ब्रिजेस ताठे, दीपक खेडकर, निलेश सत्रे,शितल सोनवणे योगेश भुजबळ, भाऊसाहेब भगत,महेश ताठे,संकेत ताठे,शैलेश सत्रे ,सचिन जगताप, निखिल ताठे,ऋषिकेश ताठे,शंकर आढाव,अतुल पडोळे,अनुराग पडोळे आदी उपस्थित होते.

प्रा.माणिक विधाते म्हणाले, अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी उप मुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांनी वेळोवेळी योगदान दिले आहे. त्यांना विकासाची मोठी दृष्टी होती. त्यांच्या निधनाने सर्व महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे.

भीमाशंकर लांडे म्हणाले, अजित दादा पवार यांनी महाराष्ट्राला विकासाची दिशा दिली आहे.त्यांच्या माध्यमातून आईला नगर शहराचा मोठा विकास झाला आहे.प्रशासनावर त्यांची चांगली पकड असल्याने जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी ते सदैव तत्पर राहत असत.

डॉ.संदीप सुराणा म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका रुग्णासाठी रात्री साडेतीन वाजता मला फोन केला होता. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून सकाळी १० वाजेपर्यंत रुग्णाला मदत मिळवून दिली. असे कार्यतत्पर नेते म्हणून अजित पवार यांचीची ओळख होती. या श्रद्धांजली पर कार्यक्रमासाठी भुतकरवाडी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजितदादा पवार यांना ब्राम्हणवाडा ग्रामस्थांकडून भावपूर्ण श्रद्धांजली!




**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे विद्यमान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक व दुःखद निधनामुळे संपूर्ण राज्यासह ब्राम्हणवाडा गावावरही शोककळा पसरली आहे. आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीच्या वतीने गुरुवारी शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

अजितदादांच्या निधनाचे वृत्त समजताच, त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी बुधवार, २८ जानेवारी रोजी ब्राम्हणवाडा गाव पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. गावातील व्यापारी प्रतिष्ठाने, बाजारपेठ आणि शाळा-महाविद्यालयांनी स्वयंस्फूर्तीने बंद पाळून आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच गुरुवार, २९ जानेवारी रोजी सकाळी ठीक ९:३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयासमोर शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी गावातील आबालवृद्धांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दादांच्या स्मृतींना उजाळा दिला. गावाचे सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी शोकसभेत बोलताना अजितदादांच्या कार्याचा गौरव केला. "राज्याच्या विकासाचा ध्यास घेणारा एक कणखर नेता आपण गमावला आहे," अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून अजितदादांना श्रद्धांजली वाहिली. अत्यंत जड अंतःकरणाने आणि पसायदानाने या शोकसभेची सांगता करण्यात आली. संपूर्ण परिसरात सध्या शांतता असून ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.





मिरा रोड मुंबई येथे दैनिक समर्थ गांवकरी २०२६ दिनदर्शिका आणि दैनिक समर्थ गांवकरी वृत्तवाहिनीचे प्रकाशन!

## थोडक्यात बातम्या...



### वाशी येथे हळदीकुंकू समारंभ संपन्न

नवी मुंबई (स. गांवकरी) : वाशी सेक्टर १० येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या परिसरात महिला स्वच्छता सहाय्यकांनी हळदी कुंकू कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. या कार्यक्रमात रुग्णालयातील वरिष्ठ कर्मचाऱ्यांनीही उपस्थिती लावली. हे लक्षात घेण्यासारखे आहे की या महिला कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ साथीच्या काळात आपले जीवन धोक्यात घालून दिवसरात्र रुग्णांची सेवा केली आहे आणि रुग्णालय स्वच्छ ठेवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

### ट्रान्सफॉर्मर देण्याच्या बहाण्याने ८४.५८ लाखांची फसवणूक

■ एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : क्रॉम्प्टन कंपनीचे डीलर असल्याचे भासवून एका कंपनीची तब्बल ८४ लाख ५८ हजार ४३० रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार येथील नागापूर एमआयडीसीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जे. अँड एस. पॉवर सोल्यूशन कंपनीच्या मालकांविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बजाज पॉवर इक्वीपमेंटस प्रा. लि. कंपनीचे मॅनेजर बाबासाहेब शंकर बनकर (वय-४५, रा. हनुमाननगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. प्रसन्ना जी. एम., सुष्टीश्री प्रसन्ना (जेएस पॉवर सोलुशन कंपनीचे मालक) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी बनकर हे बजाज पॉवर इक्विपमेंट्स प्रा. लि. कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. मे २०२५ पासून संशयित आरोपींनी बनकर यांचा विश्वास संपादन करण्यास सुरूवात केली होती. प्रसन्ना जी. एम. आणि सृष्टीश्री प्रसन्ना यांनी आपण क्रॉम्प्टन कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे बनकर यांना सांगितले. त्यानंतर ट्रान्सफॉर्मर पुरवठा करण्याच्या नावाखाली त्यांनी बनकर यांच्याकडून वेळोवेळी आरटीजीएसव्दारे ८४ लाख ५८ हजार ४३० रूपये स्वीकारले. दरम्यान, मोठी रक्कम घेऊनही संशयित आरोपींनी संबंधित कंपनीला ट्रान्सफॉर्मर दिले नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच बनकर यांनी पोलिसांत धाव घेतली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रसन्न जी. एम. आणि सृष्टीश्री प्रसन्ना यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक परदेशी या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर वादग्रस्त पोस्ट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि.२८) सकाळी नऊ वाजेच्या सुमारास बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. यामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. अशा परिस्थितीत संगमनेरातील शिवसेना शहरप्रमुखाने समाज माध्यमावर वादग्रस्त पोस्ट टाकल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्याची तत्काळ पदावरुन हकालपट्टी देखील करण्यात आली आहे. याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर शिवसेनेचे शहरप्रमुख (शिंदे गट) दिनेश भीमाशंकर फटांगरे (रा. संगमनेर) याने समाज माध्यमावर वादग्रस्त पोस्ट टाकल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी वैशाली राऊत (रा. घुलेवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांनुसार दिनेश फटांगरे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक इमरान खान हे करत आहे. दरम्यान, या प्रकाराने तणावाचे वातावरण निर्माण होवून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. पोलीस ठाण्याजवळ ठिय्या दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. संगमनेर शिवसेना शहरप्रमुख दिनेश फटांगरे याने समाज माध्यमावर वादग्रस्त पोस्ट केल्याची आमदार अमोल खताळ यांनी गंभीर दखल घेत तत्काळ कारवाईच्या सूचना दिल्या. त्यावरुन उत्तर नगर जिल्हाप्रुख कमलाकर कोते यांनी फटांगरे याची तत्काळ पदावरुन हकालपट्टी केली आहे.

### श्रीस्वामी समर्थ भक्तांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली



अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील श्रीस्वामी समर्थ मंदिर गोविंद नगर शहापूर ता.अर्धापूर येथे दर गुरुवारी महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. श्रीस्वामी समर्थ मंदिरात महाआरती करून संस्थांचे संस्थापक अध्यक्ष संतोष साबळे महाराज यांच्या अमृतवाणीतून शब्द सांगण्यामध्ये दोन महिन्यापासून २६ अंक भारतासाठी देशासाठी महाराष्ट्रासाठी थोडा घातक आहे असं महाराज सांगत असताना जानेवारी महिन्यामध्येच पहिल्यांदा जवानांचा विमानाचा अपघात झाला होता. उपमुख्यमंत्री स्व अजित पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाल्यामुळे श्रीस्वामी समर्थ मंदिरात हजारो भाविक भक्तांनी श्रीस्वामींना प्रार्थना करून श्रद्धांजली वाहिली.

## अजित पवार यांना शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



**बारामती : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना काल शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.

याशिवाय विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ,उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील,मंत्री हसन मुश्रीफ, आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश,खासदार निरजजी चंद्रशेखर,मंत्री गणेश नाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, दत्तात्रय भरणे,पंकजा मुंडे,गिरीश महाजन,मंगलप्रसाद लोढा,संजय राठोड,कु.आदिती तटकरे,शंभूराज देसाई, जयकुमार गोरे,शिवेंद्रराजे भोसले,प्रा.डॉ.अशोक उईके, नरहरी झिरवाळ तसेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर,आकाश फुंडकर उपस्थित होते.

प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. अंत्यसंस्कारापूर्वी अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक,शेतकरी, युवक, महिला तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी शांतपणे रांगेत उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

## दाभड येथे ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा डोक्यात दगड घालून खून



■ तपास करुन आरोपीला अटक करण्याचे पोलिसांना आवाहन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील दाभड येथे बुधवारी एका ७५ वर्षीय वृद्ध महिलेची निर्घृण हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. पार्वतीबाई प्रताप सूर्यवंशी असे मृत महिलेचे नाव असून, शेतात जात असताना अज्ञाताने त्यांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केला. दाभड येथील पार्वतीबाई प्रताप सूर्यवंशी या दि. २८ बुधवारी रोजी सकाळी नेहमीप्रमाणे आपल्या शेताकडे जाण्यासाठी घरून निघाल्या होत्या. मात्र, बराच वेळ झाला तरी त्या शेतात पोहोचल्या नाहीत आणि घरीही परतल्या नाहीत. त्यामुळे काळजीत पडलेल्या नातेवाईकांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. शोध घेत असताना दाभड शिवारातील एका विहिरीजवळ पार्वतीबाई सुर्यवंशी यांचा मृतदेह आढळला. त्यांच्या डोक्यात मोठा दगड घालून त्यांची हत्या करण्यात आल्याचे दिसून आले.

## रयत संकुलाच्यावतीने अजित पवार यांना श्रद्धांजली

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

एका भीषण विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत संकुलाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बाबासाहेब भोस यांच्या संयोजनाने पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते.

यावेळी बोलताना बबनराव पाचपुते म्हणाले, "अजितदादांसारखा नेता पुन्हा होणे नाही. झटपट निर्णय घेण्याची क्षमता, कार्यकर्त्यांचे योग्य मूल्यमापन आणि त्यांच्यावर असलेले प्रेम ही त्यांची वैशिष्ट्ये होती. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी कार्यमग्न असत." अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस म्हणाले, "समाजाच्या कल्याणाचा ध्यास असणारा नेता घडण्यासाठी प्रचंड कष्ट लागतात. समाज व जनतेसाठी समर्पित असलेल्या अजित पवार यांच्या अपघाती निधनाने समाजाची मोठी हानी झाली आहे. लाख गेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जाऊ नये," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

भोकरदन विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी अजित पवार यांच्या कार्यातील अनेक आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.

आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, "रयत शिक्षण संस्थेचे रोपटे लावणारे कर्मवीर भाऊराव पाटील महान आहेतच; मात्र त्या रोपट्याचा विशाल वटवृक्ष होण्याच्या प्रवासात अजित पवार यांचे योगदान मोलाचे आहे."

रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अण्णासाहेब शेलार म्हणाले, "अजित पवार हे शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे, शिस्तप्रिय नेते होते. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे नुकसान झाले आहे."

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे, संस्कारांची शिदोरी जपावी. ममतेचे दान, त्याग, समर्पण, विश्वास, श्रद्धा व आत्मविश्वास यांशिवाय जीवनाला पूर्णत्व येत नाही, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते व कथाकार डॉ. सुशीलकुमार धनमने यांनी केले. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी कलावंतांच्या साथीने वासुदेव आख्यान संगीतमय पद्धतीने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. महाविद्यालयीन जीवन हे आयुष्य घडविण्याचा महत्त्वाचा टप्पा असून उपलब्ध सुविधा व संधींचा पुरेपूर उपयोग करून विद्यार्थ्यांनी अभ्यासात प्रगती करावी व उज्ज्वल भविष्य घडवावे, असा संदेश त्यांनी दिला. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, व्यक्तिमत्त्वाची घडण ही विद्यार्थी जीवनातच होत असल्याने कष्ट, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर स्वतःचे जीवन घडवावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले. वार्षिक पारितोषिक वितरणानिमित्ताने विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'रंगोत्सव तरुणाईचा – कलाविष्कार एम.जे.एस.चा' या सांस्कृतिक कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. तसेच पुष्परचना, ट्रॅडिशनल डे, फूड फेस्टिव्हल, रांगोळी, निबंध, मेहंदी आदी विविध स्पर्धांचे आयोजन करून त्यातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. याप्रसंगी कला व क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी, सेट-नेट व विविध स्पर्धा परीक्षांत यश संपादन करणारे विद्यार्थी, विविध पुरस्कारप्राप्त प्राध्यापक, ग्रंथलेखक, संशोधन प्रबंध व पेटंट प्रकाशित करणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. समारंभाला नगराध्यक्ष सौ. सुनीताताई खेतमाळीस, उपनगराध्यक्ष सौ. अलकाताई अनभुले, महाविद्यालय विकास समिती सदस्य नगरसेवक महावीर पटवा, पोपटराव खेतमाळीस, कुंडलिकराव दरेकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सौ. लता जरे, पत्रकार पीटर रणसिंग आदी मान्यवर उपस्थित होते. अहवाल वाचन प्रा. पंकज कदम यांनी केले.

कार्यक्रमात शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागुल, प्रा. संजय डफळ, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, डॉ. बापू देवकर, प्रा. रमेश भुजबळ, प्रा. भाऊ बुलाखे, प्रा. संदीप दरेकर, प्रा. सोनाली रायकर, प्रा. देवेंद्र बहिरम, प्रा. संजय फटे आदींनी विभागीय अहवाल सादर करत सूत्रसंचालन केले.

हा समारंभ यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम कानडे, जिमखाना विभागप्रमुख प्रा. रमेश थोरात, प्रा. विनोद सासवडकर, कार्याध्यक्ष रघुनाथ लोखंडे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी कार्याध्यक्ष डॉ. नितीन थोरात यांनी आभार मानले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन

## विमान अपघाताबाबत मोठा खुलासा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झालं. विमानतळावर लँडिंग करत असताना चार्टर्ड विमान कोसळलं. दृश्यमानता कमी असल्यानं हा अपघात झाल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान या अपघाताप्रकरणी लिअरजेट विमानाचे मालक व्हीके सिंग यांनी धक्कादायक माहिती दिलीय.

लँडिंग करताना पायलटने कदाचित धावपट्टीकडे दुर्लक्ष करत मिस्ड अप्रोच केलं असावं. मिस्ड अप्रोच म्हणजे पायलट विमान उतरवू शकला नाही आणि विमान परत वर नेले. पण प्रश्न असा आहे की घटनेच्या वेळी बारामतीमध्ये दृश्यमानता ३ किलोमीटर होती.

लँडिंग करताना पायलटला कदाचित धावपट्टी दिसली नसेल आणि त्याने मिस्ड अप्रोच केलं असावं, अशी माहिती अपघातग्रस्त विमानाच्या मालक व्ही.के. सिंग यांनी आपल्या निवेदनात दिलीय. सुरुवातीला असेच दिसते की पायलटला धावपट्टी दिसली नसेल. त्यामुळे त्याने मिस्ड अप्रोच केला असेल. जेव्हा पायलटला लँडिंग करणे शक्य नसेल तर मिस्ड अप्रोच करत असतो. 'मिस ॲप्रोच' ही एक मानक प्रक्रिया आहे जी वैमानिक करतात जेव्हा इन्स्ट्रुमेंट ॲप्रोच दरम्यान सुरक्षितपणे लँडिंग पूर्ण करता येत नाही, ज्याला अनेकदा गो-अराउंड देखील म्हणतात. विमान वाहतूक क्षेत्रात मिस्ड अप्रोच ही एक मानक प्रक्रिया आहे, हे पायलट तोपर्यंत करतो जोपर्यंत इंस्ट्रूमेंट अप्रोच पूर्ण करू शकत नाही आणि सुरक्षितपणे उतरू शकत नाही. सोप्या भाषेत सांगायचे तर जेव्हा लँडिंगचा प्रयत्न अयशस्वी होतो किंवा असुरक्षित असल्याचं दिसतं तेव्हा पायलट मार्ग सोडून देतो आणि विमान परत वरती नेत असतो.

ही प्रक्रिया International Civil Aviation Organization आणि Federal Aviation Administration सारख्या या प्रक्रिया एजन्सींद्वारे निश्चित केल्या जातात. प्रत्येक इन्स्ट्रुमेंट ॲप्रोच चार्टवर वेगळ्या विभागात लिहिली जाते. मिस्ड अप्रोच म्हणजे "लँडिंग होत नसल्यास पायलट विमान सुरक्षितपणे परत वरती नेत असतो.

दृश्यमानता आणि खराब असल्यास त्यावेळी हे टेक्निक जीव वाचवण्यासाठी उपयोगी पडते. एव्हिएशन डिक्शनरीमध्ये, गो-अराउंड ही एक सुरक्षितता प्रक्रिया देखील आहे, ज्यामध्ये पायलट लँडिंगचा प्रयत्न रद्द करतो आणि ताबडतोब विमान परत वर घेतो. ही एक नियमित पण महत्त्वाची युक्ती आहे, जी पायलट स्वतः सुरू करू शकतो किंवा एअर ट्रॅफिक कंट्रोल (ATC) च्या निर्देशानुसार करू शकतो.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# स्व. अजितदादांचे योगदान महत्वाचे : सुजित झावरे पाटील

## वासुंदे येथे स्व. माजी आमदार वसंतराव झावरे यांचे पुण्यस्मरण; उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही श्रद्धांजली

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्याच्या विकासामध्ये उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे मोठे योगदान राहिले आहे. माझे वडील स्व. माजी आमदार वसंतराव झावरे पाटील यांच्या कालखंडात अजितदादांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टी आणि सहकार्यामुळे पारनेरला विकासाच्या उंचीवर नेले गेले. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांत अजितदादांच्या मार्गदर्शनाने अनेक प्रकल्प पूर्ण झाले. स्व. वसंतराव दादांच्या कार्याला पूरक ठरलेले हे योगदान आजही तालुक्यातील जनतेला प्रेरणा देत आहे. अजितदादांच्या नेतृत्वाने पारनेरचा कायापालट झाला, हे कायम स्मरणात राहील. असे मत जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील, यांनी मत व्यक्त केले.

पारनेर तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार स्व. वसंतराव झावरे पाटील यांचे १० वे पुण्यस्मरण गुरुवार दि. २९ जानेवारी वासुंदे येथे भावपूर्ण वातावरणात साजरे झाले. या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना सुध्दा श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील, सुदेश झावरे पाटील यांच्या हस्ते श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्व. वसंतराव झावरे पाटील यांनी पारनेर तालुक्याच्या विकासासाठी अमूल्य योगदान दिले. ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांत त्यांची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम लाभले. गोरगरीब जनतेचा आधारस्तंभ म्हणून ते ओळखले जात होते. त्यांच्या कार्याने तालुक्यातील अनेक विकासकामे पूर्ण झाली.

कार्यक्रमात सुजित झावरे पाटील यांनी वडिलांच्या स्मृतीला उजळवताना उपस्थितांना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. स्व. वसंतराव दादांचे तालुक्यातील योगदान कायम स्मरणात राहील, अशी भावना व्यक्त झाली.

सुजित झावरे पाटील, सुदेश झावरे पाटील, यांच्यासह माजी सभापती अरुण ठणगे, गुरुदत्त पतसंस्था संस्थापक चेअरमन बा. ठ. झावरे पाटील, सुरेश पठारे, बाळासाहेब खिलारी, रावसाहेब झावरे, महेश पाटील, मोहन रोकडे, मोहन रांधवन, उद्योजक भगवान वाळुंज, स्वप्नील राहिंज, माजी उपसरपंच शंकर बर्वे, सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, रणजित पाटील, नेते शिवाजी खोडदे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक लहू जाधव, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, मळीभाऊ रांधवन, योगेश वाळुंज, रविंद्र पायमोडे, चेअरमन सूर्यभान भालेकर, जेष्ठ नेते भागुजी झावरे, शरद पाटील, रामचंद्र झावरे सर, रभाजी झावरे सर, भाऊ सैद, दिलीप पाटोळे, लहानू झावरे, रा. बा. झावरे, बाळासाहेब झावरे, नारायण झावरे, पो. मा. झावरे, बापुसाहेब गायखे, उद्योजक संदीप दाते, संग्राम झावरे, अशोक चेमटे, पांडुरंग बर्वे सर, शांताराम झावरे, इंजि. प्रसाद झावरे, शुभम गुंदेचा सुनील टोपले, खंडू टोपले, सोन्याबापू बर्वेसाहेब, ए. के ठुबे सर, सुभाष बर्वे, पी. डी. बर्वे, भाऊसाहेब झावरे, साहेबराव गुंजाळ, संदीप खंडाळे, पत्रकार वसंत रांधवन, बाळासाहेब वाबळे, मारुती उगले, संपत झावरे सर, शिवाजी झावरे सर, नितीन बर्वे मेजर, उत्तम तळेकर, आदी उपस्थित होते.

> स्व. माजी आमदार वसंतराव झावरे पाटील हे पारनेर तालुक्याचे खरे भाग्यविधाते होते. त्यांच्या काळात ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळाली. रस्ते, पाणी, शिक्षण आदी क्षेत्रांत त्यांची दूरदृष्टी आणि जनसेवेची निष्ठा अतुलनीय होती. गोरगरीब जनतेचा आधारस्तंभ असलेले वसंतराव दादा आजही आमच्या हृदयात जिवंत आहेत. त्याचा सहवास लाभला ते माझे मार्गदर्शक व गुरू होते. त्यांचे कार्य कायम प्रेरणादायी राहील.
>
> **- बाळासाहेब खिलारी (टाकळी ढोकेश्वर)**

> स्व. वसंतराव झावरे पाटील हे पारनेर तालुक्याच्या विकासाचे खरे शिल्पकार होते. त्यांच्या काळात ग्रामीण भागाला रस्ते, पाणी, शाळा, आरोग्य सेवा मिळाली. जनतेच्या हृदयात घर करणारे वसंतराव दादा गोरगरिबांचे खरे रक्षक होते. त्यांची निष्ठा, दूरदृष्टी आणि सेवाभाव आजही आम्हाला मार्गदर्शन करतो. त्यांचे कार्य अमर राहील.
>
> **- बा. ठ. झावरे पाटील (चेअरमन, गुरुदत्त पतसंस्था)**

## मोलाचे योगदान देणाऱ्या कणखर नेतृत्वाला महाराष्ट्र मुकला

नायगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजितदादांना सर्वपक्षीय शोकसभा घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली

**नायगावः (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील नायगाव येथील नायगाव तालुक्यातील हेडगेवार चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्वपक्षीय कार्यकर्ते व नागरिकांनी अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी शिवराज पाटील होटाळकर यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, आमचे लाडके, कणखर, प्रेमळ आणि सदैव मार्गदर्शक असलेले अजितदादा आपल्यातून निघून गेले, हे वास्तव स्वीकारणं कठीण आहे. ही बातमी ऐकताच डोळ्यासमोर अंधार दाटून आला. महाराष्ट्राने आज विकासासाठी झटणारे, शब्दाला जागणारे आणि जनतेशी नाळ जोडलेले नेतृत्व गमावले आहे."

कामाप्रती प्रचंड निष्ठा, प्रशासनावर पकड आणि दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व म्हणून अजितदादा पवार ओळखले जात होते. त्यांच्या अनोख्या कार्यशैलीमुळे त्यांनी प्रशासनात वेगळा दरारा निर्माण केला होता. जनतेत रमणारा, जनतेसाठी झटणारा हा खरा लोकनेता होता. ते केवळ नेते नव्हते, तर लाखो कार्यकर्त्यांच्या हृदयात धडधडणारे धैर्य होते.

"त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.

मात्र त्यांचे विचार, त्यांचे कार्य आणि लढवय्या वृत्ती सदैव आम्हाला योग्य दिशा दाखवत राहील. दादा आमच्यातून गेले असले, तरी आमच्या हृदयातून कधीच जाणार नाहीत," अशा शब्दांत होटाळकर यांनी श्रद्धांजली वाहिली.

## 'भारत कुष्ठरोगापासून मुक्त करूया'

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने येळी ता. पाथर्डी येथे सर्वप्रथम विकसित भारत अभियानाच्या निमित्ताने आजच्या ग्रामसभेच्या बैठकीला उपस्थित राहिलेल्या सर्व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, क्लबचे सदस्य, धार्मिक नेते, ग्रामस्थ, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील मुले -मुली या सर्वांनी कुष्ठरोग होऊ नये यासाठी शपथ घेतली. ज्या व्यक्तीच्या त्वचेवर फिकट रंगाचे डाग आहेत. त्यांच्या संवेदना कमी झालेल्या आहेत. अशा संशयित व्यक्ती रुग्ण असू शकतात. त्यासाठी त्वरित आरोग्य यंत्रणेची संपर्क साधावा. उपचारासाठी उशीर केल्यास अपंगत्व येऊ शकते. कोणत्याही अंधश्रद्धा गैरसमज आणि चुकीच्या कल्पना वर विश्वास ठेवू नये. अशी प्रतिज्ञा ग्रामस्थांनी घेतली.

## तामसा येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



तामसा येथील विविध शाळा महाविद्यालय विविध शासकीय कार्यालयात विद्यार्थ्यांची ढोल ताशांच्या गजरात प्रभातफेरी, देशभक्तीपर गीतांचा जल्लोष आणि ध्वजारोहराने प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर घोषणांनी आसमंत निनादून गेला होता. सकाळी सकाळी राष्ट्रभक्ती व देशभक्तीचे वातावरण आले होते.

प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी सकाळी ७ .५ वा तामसा पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या हस्ते पार पडलेल्या ध्वजारोहणाने शहरातील विविध शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालयात ध्वजारोहणाला सुरुवात झाली. अनेक शाळांच्या हजारो विद्यार्थ्यांची मुख्य रस्त्यावरून बँडपथक, लेझीमसह विविध प्रदर्शनाने व भारत मातेच्या गगनभेदी घोषणांनी आसमंत दुमदुमला होता. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीत चेअरमन नामदेवराव बाऊलकर, ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच आनंदराव घंटलवार, विद्यासागर मुलींचे विद्यालयात संस्थेचे कोषाध्यक्ष विजयकुमार लाभसेटवार, मुख्याध्यापिका उज्वला चिंचगव्हाणकर तामसा वीज वितरण कंपनी कार्यालयात सहाय्यक अभियंता विनोद वाठोरे, प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्यवंशी, तर विविध प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, इंग्रजी शाळा व अनेक कार्यालयात कार्यालय प्रमुखांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. शहरातील मुख्य ध्वजारोहण पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल प्रशालेच्या मैदानावर मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड,यांच्या हस्ते झाले. एनसीसी पथकाचे पथसंचलन, सांघिक कवायत, कराटे प्रदर्शन, लेझीम, भाषण, गीत गायन, बक्षीस वितरण, भितीपत्रकाचे विमोचन, प्रात्यक्षिके झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपक्रमांचे पालकांनी तोंडभरून कौतुक केले. एकंदरीत तामसा शहर व परिसरात प्रजासत्ताक दिन मोठ्या जल्लोषाने व उत्साह पूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सरपंच आनंदराव घंटलवार, सपोनि. शहादेव खेडकर, रमेश घंटलवार, दिलीप बास्टेवाड, माजी सरपंच बालाजी महाजन, माजी उपसभापती शंकर मेंडके,खाजा कुरेशी, विजय बास्टेवाड, ग्रामपंचायत अधिकारी शंकर आलेवाड, संभाजी कल्याणे, वरिष्ठ यंत्रचालक सचिन सोनसळे,विज तज्ञ बजरंग हरणे, मुख्याध्यापिका श्रीमती उज्वला चिंचगव्हाणकर,निर्मला ठाकूर,उप मुख्याध्यापक डॉ. प्रशांत भोजनकर, मुख्याध्यापक राज बास्टेवाड, अमोल कंठाळे सह शाळा समिती, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस उपअधीक्षक पुष्पलता दिघे यांना राष्ट्रपती पदक जाहीर

### संगमनेर तालुक्यातील रहिवाशी

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



पोलीस उपअधीक्षक सौ. पुष्पलता दिघे यांना उल्लेखनीय आणि उत्कृष्ट सेवेबद्दल भारत सरकारचे मानाचे राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. सौ.दिघे या संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील रहिवाशी असून रायगड विभाग महामार्ग सुरक्षा पथकात पोलिस उपअधीक्षक पदावर कार्यरत आहेत. सौ. पुष्पलता दिघे यांना पोलीस दलातील त्यांच्या प्रदीर्घ आणि कर्तव्यदक्ष सेवेची दखल घेऊन हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या कार्यकाळात विविध विभागांमध्ये अत्यंत आव्हानात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. महामार्ग पोलीस सुरक्षा विभागात त्यांनी महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी 'शून्य अपघात मोहिमे' सारखे प्रभावी उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. यापूर्वी राज्य गुप्तवार्ता विभागात कार्यरत असताना दहशतवाद आणि नक्षलवाद विरोधी मोहिमेत माहिती संकलनाचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले आहे. तसेच गुन्हे शाखेमध्ये असताना अनेक क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. विशेषतः गुन्हे शाखेत कार्यरत असताना 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत पीडित महिला व मुलींची सुटका करणे, तसेच 'ऑपरेशन स्माईल' च्या माध्यमातून अपहरण झालेल्या बालकांना शोधून त्यांना पुन्हा कुटुंबापर्यंत पोहोचवण्याच्या कामात त्यांनी विशेष योगदान दिले आहे. अनैतिक मानवी तस्करी आणि बालकामगार विरोधी मोहिमांमधील त्यांच्या कामगिरीची दखल देशपातळीवर घेण्यात आली आहे. त्यांच्या या कर्तबगारीबद्दल त्यांना यापूर्वी पोलीस महासंचालक आणि गृह विभागातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारांनीही गौरवण्यात आले आहे. तसेच उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि पोलीस महासंचालक (सी आय डी) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. रस्ता सुरक्षा जनजागृती, सायबर गुन्हे प्रतिबंध तसेच विविध महत्त्वाच्या तपास प्रकरणांमध्येही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. गुप्तवार्ता संकलन व वेळेवर दिलेल्या अचूक माहितीमुळे विभागाला अमूल्य मदत झाली आहे. सौ. पुष्पलता दिघे या १९९६ च्या PSI बॅचमधील पहिल्या महिला परेड कमांडर असून, त्यांच्या बॅचदरम्यान उत्कृष्ट कायदेशीर ज्ञान, कौशल्य आणि समर्पित सेवेसाठी त्यांना ६ प्रतिष्ठित कायदा पुरस्कार प्राप्त झाले. याच भक्कम पायावर त्यांच्या कायदा अंमलबजावणीतील उज्ज्वल कारकिर्दीची पायाभरणी झाली. सौ पुष्पलता दिघे या प्रामाणिकपणा, विश्वासार्हता आणि व्यावसायिकतेच्या सर्वोच्च मूल्यांचे प्रतीक आहेत. कायदा अंमलबजावणी व सार्वजनिक सेवेप्रती त्यांची निष्ठा व समर्पण निश्चितच प्रशंसनीय आहे. या त्यांच्या वरील उत्कृष्ट कार्याची दखल केंद्र शासनाने घेतली असून त्यांना पोलीस सेवेतील गुणवत्तापूर्ण सेवेबद्दलचे राष्ट्रपतीपदक 26 जानेवारी च्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आले आहे.


## मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त कवीसंमेलन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिकेच्या सेवेतील कर्मचारी अधिकारी हे सुध्दा चांगले लेखक, गापडवळयक, कवी आहेत. तसेच ठाणे महापालिका ही नेहमीच कलेचा आदर करीत आली आहे. कलावंत आणि कला जपणारी महापालिका असा ठाणे महापालिकेचा नावलौकिक आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी यांनी येथे केले. ठाणे महापालिकेतर्फे मराठी भाषा पंधरवड्या निमित्ताने विविध साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच श्रृखंलेतील कवी संमेलन दिनांक 27 जानेवारी रोजी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पार पडले. या कार्यक्रमास उपायुक्त उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भोकर येथे अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात बारायती येथे दि. २८जानेवारी रोजी दुखद निधन झाले. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सर्व पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

गुरुवार दि. २९जानेवारी रोजी येथील डॉ.आंबेडकर चौकात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शोकसभा घेतली यावेळी ओबीसी नेते नागोराव शेडगे म्हणाले राष्ट्रवादीचे धडाडीचे खंबीर नेतृत्व हरवले आहे. दादाच्या जाण्याने राजकीय पोकळी निर्माण झाली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पत्रकार एल. ए. हिरे म्हणाले अजित दादा हे परखड बोलणारे ग्रामीण भागावर विकासासाठी भर देणारे खंबीर नेतृत्व होतं फुले शाहू आंबेडकर पुरोगामी विचाराचे दादासारखं नेतृत्व अचानक नाहीसे झाल्याने महाराष्ट्रात राजकीय पोकळी निर्माण झाल्याची श्रद्धांजली यावेळी बहुजन नेते नागनाथ घिसेवाड राष्ट्रवादी पक्षाचे विधानसभा अध्यक्ष शिवाजी पाटील लगळुदकर, ताहेर बेग युवा तालुका अध्यक्ष परशुराम पाटील डौरकर,महिला तालुका अध्यक्ष यशोदाबाई शेळके, चंद्रकला गायकवाड,शकुंतला देशमुख, सुरेश कावळे, जवावोद्दीन बरबडेकर, रजाक सेठ पत्रकार अनिल डोईफोडे, अजय टाक पत्रकार गंगाधर पडोळे शेखर कुंटे, शिवसेनेचे सुभाष नाईक, भाजपचे परमेश्वर भालेराव, आप्पाराव राठोड, जगदेराव देशमुख, कासिफ पटेल रवीगेंटेवार इत्यादीसह असंख्य कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते अनेकांच्या राष्ट्रवादी पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रूत तरळत होते. अत्यंत भावनिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम घेण्यात आला.




## अजित पवार यांना आदरांजली

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधन च्या बातमी महाराष्ट्र सह देशभरात शोककला पसरल्या. तामसा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष नीलकंठ कल्याणकर,राष्ट्रवादी किसान आघाडी जिलाध्यक्ष शंकर जगदाळे, शहर अध्यक्ष प्रदीप (पप्पू )शेटे,धीरज (पप्पू )कदम, गणेश व्यवहारे,शारुख पठाण, अस्लम पठाण,वंचित आघाडी चे युवा तालुका अध्यक्ष जयकीन रावले, भाजप सोशल मीडिया चे सचिन तांदळे,भाजप पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, गणेश व्यवहारे, रुपेश अमृते, व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष विजय लाभसेठवार, खंडेराव आगलावे,आंनता भोपळे, गणेश पवार, माजी सरपंच प्रभाकर महाजन, बालाजी वाकोडे, संतोष ठमके, विशाल भालेराव, संतोष नील्लावार,पत्रकार बाळासाहेब खानजोडे, गौतम कदम, डॉ उत्तम शिंदे, सरपंच आनंद घंटळवार, राष्ट्रवादी महिला आघाडी मनीषा जाधव, गीता बाई साळवे, अमोल वानखेडे, गजानन कल्याणकर, स. द कल्याने, सपोनि शहादेव खेडकर,विनायक शेटे सह सर्वपक्षीय, सामाजिक कार्यकर्ते, महिला पुरुष यांनी आदरांजली वाहिली..

## निघोजमध्ये कडकडीत बंद



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची दुखद बातमी निघोज आणी परिसरात समजली. आणी सर्वच जण सुन्न झाले. जो तो एकमेकांना फोन करुण या दुर्घटनेची चौकशी करीत बातमीची खातरजमा करीत होते. मात्र इलेक्ट्रॉनिक मिडिया माध्यमातून सकाळी साडेनऊ वाजता दादांचा या अपघातात मृत्यू झाल्याची बातमी जाहीर झाली. निघोज ग्रामस्थांनी दुकाने बंद करुण दादांना श्रद्धांजली अर्पण केली. दिवसभर दादांच्या आठवणींना उजाळा देत राजकीय, सामाजिक क्षेत्रातील लोकांनी दादांची कडक शिस्त,दादांचा कार्यक्षम कारभार,दादांची सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका यावर चर्चा करीत झालेल्या दुर्घटनेबद्दल दुख व्यक्त केले. १९९४ ला अजितदादा पवार उर्जा राज्यमंत्री असताना निघोज येथे सबस्टेशन उद्घाटनप्रसंगी आले होते. त्यानंतर २०१९ ला दादा निघोज येथे आले होते. मळगंगा विद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत त्यांनी तालुक्यातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते. या दोन आठवणींना उजाळा देत दिवसभर निघोजकरांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब निचीत गुरु, ज्येष्ठ मार्गदर्शक गवराम तात्या लंके, पत्रकार संघ कार्यालयाचे सल्लागार ॲड. गणेश लाळगे, वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष राजूकाका देशपांडे, अल्पसंख्याक समाजाचे नेते खंडूजी इधाटे, कार्यालयाचे मुख्य समन्वयक तसेच नगर सह्याद्री प्रतिनिधी दत्ता उनवने, राज्य पत्रकार संघाचे जिल्ह्याचे माजी कार्याध्यक्ष अनिल चौधरी, तालुकाध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, माजी उपाध्यक्ष संतोषशेठ ईधाटे, पदाधिकारी शिरीष शेलार, आनंद भुकन, योगेश खाडे, सागर आतकर, जयसिंग हरेल, निलेश जंगम, गणेश खाडे, ग्रामपंचायत माजी सदस्या सुमनताई कवाद, वैशाली खाडे,मनिषा खाडे , संगिता पोपळघट आदी ग्रामस्थ व महिला भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निघोज ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवार दि.३० रोजी सकाळी ९ वाजता शोकसभेचे आयोजन ग्रामपंचायत चौकात करण्यात आले आहे . अशी माहिती ग्रामपंचायत सदस्य अस्लमभाई इनामदार यांनी सोशल मिडिया माध्यमातून दिली आहे.

### अजितदादा एक खंबीर नेतृत्व

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी गेली तीन दशके राजकारण करताना समाजकारणाच्या माध्यमातून राज्याची सेवा करताना सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. दादांचा स्वभाव कडक असला तरी काम झाले पाहिजे,विकास झाला पाहिजे ही त्यांची भुमिका फारच महत्वपूर्ण ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेससाठी सर्वाधिक योगदान देणारे एक कार्यक्षम नेतृत्व म्हणून दादांचे पक्षासाठी सर्वाधिक योगदान आहे. युवकांना पाठबळ देत औद्योगिक विकासासाठी दादांनी राज्य विकासाला गती दिली होती. ही पोकळी भरून निघणे शक्य नाही एवढे मोठे राज्याचे नुकसान झाले आहे.

**- दत्तात्रय लाळगे**
**(माजी तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, संस्थापक अध्यक्ष डी बी लाळगे कंट्रक्शन)**

# केवळ महाकरार नोहे!



## संपादकीय


जागतिक व्यापार व्यवस्थेचा चेहरामोहरा झपाट्याने बदलत असताना, भारत आणि युरोपियन महासंघ (ईयू) यांच्यात नुकताच बहुप्रतीक्षित मुक्त व्यापार करार झाला. त्याची नोंद 'महाकरार' किंवा 'मदर ऑफ ऑल डिल्स' अशा विशेषणांनी घेतली जात आहे, ती उगाच नाही! संरक्षणवाद, टॅरिफ युद्धे आणि महासत्तांमधील स्पर्धेमुळे जागतिकीकरणाचा पाया हादरत असताना, हा करार नव्या प्रकारच्या बहुपक्षीयतेची नांदी ठरतो. भारतावर ५० टक्के टॅरिफ लादणाऱ्या अमेरिकेचा मात्र त्यामुळे तीळपापड झाला आहे. मुक्त व्यापाराची भाषा बोलता-बोलता संरक्षणवाद अवलंबिलेल्या अमेरिकेसाठी हा करार अस्वस्थ करणारा आहे, तर भारतासाठी तो आत्मविश्वासाचा आणि धोरणात्मक परिपक्वतेचा टप्पा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळलेल्या आणि परस्पर अविश्वासाने ग्रस्त असलेल्या गुंतागुंतीच्या वाटाघाटींना अखेर यश आले आहे. जागतिक व्यापारव्यवस्था विछिन्न होत असताना, संरक्षणवाद, निर्बंध आणि टॅरिफ युद्धे वाढत असताना, भारत आणि ईयूतील करार केवळ आर्थिक नाही, तर राजकीय आणि धोरणात्मक संदेश देणाराही ठरतो. अमेरिका, चीन आणि रशिया या तीन महासत्तांच्या अडकित्त्यात अडकलेल्या जगात, भारताने स्वतंत्र, स्वायत्त आणि दीर्घकालीन हितसंबंधांवर आधारित मार्ग निवडल्याचे हे द्योतक आहे. या कराराचे महत्त्व समजून घेण्यासाठी जागतिक पार्श्वभूमीकडे पाहणे आवश्यक आहे. कोविडच्या हादऱ्यातून अर्थव्यवस्था अजूनही सावरलेल्या नाहीत. रशिया–युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील अस्थिरता, लाल समुद्रातील संघर्ष यामुळे पुरवठा साखळ्या विस्कळीत झाल्या आहेत. अमेरिका 'फ्रेंड-शोरिंग' आणि 'नियर-शोरिंग'च्या नावाखाली व्यापाराचे नवे कुंपण उभे करत आहे. त्यामुळे भारत–ईयू करारामुळे अमेरिकेची चिडचिड होण्यात आश्चर्य काहीच नाही. ईयू जगातील सर्वांत मोठ्या एकत्रित बाजारपेठांपैकी एक आहे. सुमारे ४५ कोटी लोकसंख्या, उच्च क्रयशक्ती आणि तंत्रज्ञान, हरित उर्जा, औषधनिर्मिती, ऑटोमोबाइल्स, संरक्षण यांसारख्या क्षेत्रांतील प्रचंड क्षमता ही ईयूची ताकद आहे. भारतासाठी हा करार केवळ निर्यातीसाठी नवी दारे उघडणे नव्हे, तर जागतिक मूल्यसाखळीत वरच्या पायरीवर जाण्याची संधी आहे. महाकरारामुळे भारताच्या अभियांत्रिकी उत्पादने, औषधे, माहिती तंत्रज्ञान सेवा, डिजिटल सेवा, वस्त्रोद्योगातील उच्च दर्जाची उत्पादने आणि कृषी-प्रक्रिया उद्योगाला मोठा लाभ होऊ शकतो. महाकराराचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नियमाधारित व्यापार! पर्यावरण, कामगार हक्क, विदा संरक्षण आणि उत्पादन मानकांबाबत ईयू अत्यंत काटेकोर आहे. ते नियम आतापर्यंत भारतासाठी अडथळा ठरत होते. परंतु, महाकराराच्या निमित्ताने भारतीय उद्योगांना जागतिक दर्जाचे बनण्याची सक्तीची संधी मिळेल. दीर्घकालीन लाभासाठी ही गुंतवणूक अपरिहार्य ठरते. 'मेक इन इंडिया' घोषणा तेव्हाच अर्थपूर्ण ठरेल, जेव्हा भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत टिकतील! महाकरार हे त्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. रशियाकडून इंधन आयात, ब्रिक्समधील सक्रिय भूमिका आणि आता महाकरार, या सगळ्यांतून भारताची रणनीतिक स्वायत्तता ठळक होते. युरोपियन कंपन्यांसाठी भारत केवळ मोठा बाजारच नव्हे, तर उत्पादन केंद्र म्हणूनही आकर्षक ठरू शकतो. चीनमधील वाढती मजुरी, राजकीय अनिश्चितता आणि अमेरिकेच्या निर्बंधांमुळे युरोपियन उद्योग पर्यायी ठिकाणांच्या शोधात आहेत. भारताने पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स आणि धोरणात्मक स्थैर्य सुधारल्यास, युरोपातून मोठी गुंतवणूक येऊ शकते. अर्थात, भारतातील लघु आणि मध्यम उद्योगांवर तात्कालिक दबावही येईल. स्वस्त युरोपियन उत्पादनांमुळे काही क्षेत्रांना फटका बसण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे संरक्षणात्मक उपाय, संक्रमण कालावधी आणि कौशल्यविकासावर भरही गरजेचा आहे. मुक्त व्यापार म्हणजे निर्बंध नसलेला बाजार नव्हे, तर समतोल साधणारी व्यवस्था असते!

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | 1 | | 2 | | |
| 6 | | | | | | | | 5 |
| 9 | | 2 | | | | | | 1 |
| 3 | 2 | | 4 | | 1 | 7 | 5 | |
| 1 | | | 3 | | 2 | | | 9 |
| | 6 | 9 | 7 | | 8 | | 3 | 2 |
| 2 | | | | | | 4 | | 3 |
| 5 | | | | | | | | 7 |
| | | 4 | | 3 | | | 9 | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७६ चे उत्तर



उत्तर उद्याच्या अंकात

| | | |
|---|---|---|
| पंचांग | अयन- उत्तरायणारंभ | योग:वैधृति १६:५८:०१ |
| ३० जानेवारी २०२५ | मास- माघ | करण:बालव ११:०९:२३ |
| शुक्रवार | ऋतु- सौर शिशिर | करण:कौलव २१:४६:४७ |
| विक्रम संवत्- २०८२ | शुक्ल पक्ष | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्- १९४७ | तिथि:द्वादशी ११:०९:२३ | चन्द्र:मिथुन |
| संवत्सर – विश्वावसूनाम | नक्षत्र:आर्द्रा २७:२७:०७+ | हिजरी सन् - १४४६ |

## उपदेशाचे डोस

### चंद्राचे सौंदर्य

एका माणसाला चंद्राचे सौंदर्य आणि चंद्रकिरणांचा नाजुकपणा समजावा अशी इच्छा झाली म्हणून तो एका शेतामध्ये गेला. रात्रीची वेळ संथपणे वारे वहात होते. आजूबाजूला कोणी नव्हते. शांत वातावरण आजूबाजूला पसरले होते. अशावेळी तो माणूस आकाशातील चंद्राकडे पाहू लागला पण आकाशातील चंद्र आणि जमिनीवरील तो माणूस यांच्यामध्ये एक सुंदर झाड येत होते. चंद्र पाहण्याचे विसरून जाऊन तो माणूस ते झाड पाहण्यात रमून गेला. काही वेळाने चंद्राची आठवण होऊन तो आकाशात पाहू लागला पण तोपर्यंत चंद्र मावळला होता. चिन्मय जाणिवेचे ज्ञान होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

कथा उपदेश : माणूस दृश्य वस्तूंचे ज्ञान करून घेण्यात आयुष्य घालवतो. शेवटी खरे ज्ञान मिळविण्याचे राहून जाते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६४९ – इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिल्याचा शिरच्छेद.
- १८३५ – रिचर्ड लॉरेन्स नावाच्या माथेफिरू माणसाने अमेरिकेचा अध्यक्ष अँड्रु जॅक्सनचा खून करण्याचा प्रयत्न केला. लॉरेन्सची दोन्ही पिस्तुले ऐनवेळी बिघडली. चिडलेल्या जॅक्सनने लॉरेन्सला काठीने मारून पळवून लावले.

### राष्ट्रीय

- १९४८ – नथुराम गोडसेने महात्मा गांधींचा पिस्तुलाने खून केला.
- २००७ – बांगलादेशाच्या ४७ संशयित मच्छिमारांना ओरिसा तटाला लागुन असलेल्या सागरी संरक्षण हद्दीत अटक.
- २००७ – भारताच्या वायूदल प्रमुखपदी फली होमी मेजर यांची नियुक्ती.


### जन्म

- १३३ – मार्कस सेव्हेरस डिडियस ज्युलियानस, रोमन सम्राट यांचा जन्म.
- १८८२ – फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट, अमेरिकन अध्यक्ष यांचा जन्म.
- १८९४ – बोरिस तिसरा, बल्गेरियाचा राजा यांचा जन्म.
- १९१० – चिदंबरम् सुब्रमण्यम्, भारतीय राजकारणी यांचा जन्म.
- १९२७ – ओलोफ पाल्मे, स्वीडनचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९३७ – बोरिस स्पास्की, रशियन बुद्धिबळपटू यांचा जन्म.

### निधन

- ११८१ – टाकाकुरा, जपानी सम्राट यांचे निधन.
- १६४९ – चार्ल्स पहिला, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १८६७ – कोमेइ, जपानी सम्राट यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७७



**आडवे शब्द**

१. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध
४. चाणक्यनीती
१०. लगत, शेजारी-शेजारी
११. समूह, संच
१२. शेतावरील कर
१३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा
१५. चुलता
१६. घोड्याला आवर घालणारी वादी
१७. उष्ण, कढत
१९. नेमाने वारी करणारा
२०. धनुष्य, नावाडी
२१. साहित्यातील नऊ भावना
२४. सरळ लांब वासा
२५. यज्ञ
२६. फार उष्ण व थंड नसलेले
२८. अनाथांना आश्रय देणारी संस्था
२९. निरर्थक बडबड
३१. छंद, आवाज
३२. 'अपना हाथ ----!'
३३. सध्याचे युग
३४. मोठी बहीण
३५. वर्ष, सन
३६. उजाड
३८. कान व डोळे यामधील भाग
४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार- --- सरकार
४२. कौसल्यापुत्र
४३. जनावरांचा समूह
४४. हिंमत, धैर्य
४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र
४७. दुप्पट (इंग्रजी)
४९. मध्यस्थ
५१. हिंदीत कीव, करूणा
५३. शर्विलक
५४. नोकर
५६. परग्रहावर जाणारे वाहन
५९. मेहरबानी
६०. बरोबर आलेली मंडळी
६३. जमीनजुमला
६६. श्रीमंत
६७. फोडामधील द्रव
६९. अवाढव्य, प्रचंड
७१. धैर्य
७२. मोठा समुद्र
७३. सूत काढण्याचे साधन
७४. वरपांगी, दिखाऊ

**उभे शब्द**

१. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण
२. टक, दृष्टी
३. सनसनाटी
४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा
५. मळलेला
६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
७. अस्थिर, डळमळीत
८. अर्पिलेली वस्तू
९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश
१२. क्षुधावर्धक गरम पेय
१४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा
२०. हिंदीत सावली
२१. रोख
२२. नवरदेव
२३. पोरका
२४. सक्तमजुरीची शिक्षा
२७. बंदी
२८. उपासमारीची स्थिती
३०. जम
३३. चिवचिवाट
३४. संगीतातील ठेका
३५. वर्षानुवर्षे
३७. सारखा
३८. कपडालत्ता
३९. गार, थंड
४१. संगीतातील एक राग
४४. अगम्य
४५. नूतन
४८. फणसाचा एक प्रकार
५०. कीव, करूणा
५२. रत्न
५५. गव्हाचे जाडसर पीठ
५७. लग्नातील नवरा मुलगा
५८. देशी दारू
६१. सैन्यातील एक हुद्दा
६२. सामान
६४. बातमीदार
६५. मुलायम
६८. षट, पाचनंतरचा आकडा
६९. नंतर
७०. पराभव, माळ
७१. प्रामाणिक

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ७६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

उभे उत्तर : १.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

# व्यक्तिमत्व विकास घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते

## प्राचार्या माहेश्वरी गावित : बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या एनएसएस हिवाळी शिबिरास मढी येथे प्रारंभ

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रीय सेवा योजनेच्या चिन्हामधील निळा रंग म्हणजे मानवतेचे प्रतीक, लाल रंग म्हणजे ऊर्जा व चैतन्याचे प्रतीक तर बोधवाक्यामध्ये समाजाचा व पर्यावरणाचा विचार करण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर म्हणजे विचारांचे भांडार असून ते व्यक्तिमत्व विकास प्रगल्भ करण्याचे महत्त्वाचे ठिकाण आहे.आपण समाज व निसर्गासाठी काहीतरी देणे लागतो ही भावना प्रत्येकाने अंगीकारल्यास समाजात सकारात्मक बदल होण्यास वेळ लागत नाही. समाजसेवेसाठी दिवसाचे काही मिनिटे जरी खर्च केली तरी त्यातून होणारे परिवर्तन खूप मोठे असते. हे समाजसेवेचे बीज प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये रुजविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते, असे प्रतिपादन पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. त्या बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मढी येथील विशेष हिवाळी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे तर व्यासपीठावर कानिफनाथ देवस्थानच्या विश्वस्त उषा मरकड, प्रदीप पाखरे, दादासाहेब बडे, एनएसएस विभागप्रमुख डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, डॉ. वैशाली आहेर, डॉ. अशोक कानडे, डॉ. विजय देशमुख, डॉ. अशोक डोळस आदी उपस्थित होते.

डॉ. गावित पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी एनएसएस शिबिरातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करावी. एआय च्या जगात शिक्षकांची भूमिका वाढली असून समाजभिमुख विद्यार्थी शिक्षकांना अपेक्षित आहेत.लोकमान्य टिळकांनी मृत्यू हा अंतिम सत्य आहे हे अधोरेखित केले. आपली भाषा व संस्कृती नष्ट होऊ नये यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शब्दाची ताकद प्रत्येकाने ओळखणे गरजेचे असून समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यामध्ये याचा खूप मोठा उपयोग होतो. भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन संस्कृती असून संपूर्ण जगासाठी ती आदर्शवत व प्रेरणादायी ठरली आहे. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा उपयोग करून समाजात बदल घडविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणे आज आवश्यक ठरले आहे. प्र के अत्रे यांच्या मुरलीवाला कवितेतून सर्जनशीलता अतिशय चांगल्या प्रकारे चित्रित केली आहे. आज विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचे महत्त्व कमी होत चालले असून सोशल मीडियाच्या प्रभावामुळे विद्यार्थी ग्रंथालयाकडे जात नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले असून वाचाल तर वाचाल ही उक्ती त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात अंगीकारली. डॉ आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन समाज परिवर्तनात हातभार लावावा असे आव्हान केले होते. विद्यार्थ्यांनी महापुरुषांची चरित्रे वाचून आपला व्यक्तिमत्व विकास घडविण्याबरोबरच समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो ही भावना सदैव मनाशी बाळगावी. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाबरोबरच समाज व समाजातील प्रत्येक घटकांशी कशा प्रकारे वागावे हे शिकविते समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे हेच खरे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य आहे, असे त्या शेवटी म्हणाल्या.

# लाखो भाविकांच्या साक्षीने भव्य यात्रा संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा शहरातील औटेवाडी येथे प्रथमच शहराच्या वतीने संत सद्गुरू बाळुमामांची भव्य यात्रा तसेच पारंपरिक कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले. या यात्रेला महिला, युवकांसह सर्व वयोगटातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. परिसरासह बाहेरगावाहून आलेल्या भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी यात्रेला सुरुवात झाली. यात्रेनिमित्त मोठ्या पाळण्यांची उभारणी करण्यात आली होती. श्रीगोंदा शहरासह परिसरातील तसेच इतर तालुक्यांतून आलेल्या भाविकांनी सद्गुरू बाळुमामांना शेरणी अर्पण करून दर्शन घेतले. औटेवाडी ते सप्रेवाडी दरम्यान भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.


मंगळवार, दि. २७ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता ऐतिहासिक कुस्ती आखाड्याला प्रारंभ झाला. नेपाळचा तसेच भारतातील सुप्रसिद्ध कुस्तीपटू देवा थापा याच्या सहभागामुळे आखाड्याबाबत नागरिकांमध्ये विशेष उत्सुकता होती. सायंकाळी साडेसहा वाजता देवा थापाचे आगमन होताच प्रेक्षकांनी जल्लोषात स्वागत केले. तालुक्यासह बाहेरील जिल्ह्यांतील अनेक नामवंत मल्लांनी आखाड्यात सहभाग घेतला. प्रारंभीच्या कुस्त्यांसाठी एक हजार ते पन्नास हजार रुपयांपर्यंत बक्षिसे ठेवण्यात आली होती.

प्राचार्य शहाजी हिरडे व तुपे गुरूजी यांच्या हस्ते ११ हजार रुपयांची कुस्ती लावण्यात आली. सायंकाळी सात वाजून १५ मिनिटांनी अखेरची आणि सर्वाधिक उत्सुकतेची कुस्ती देवा थापा व हरयाणाचा पैलवान अमित लाखा यांच्यात झाली. यात्रा कमिटीच्या वतीने या कुस्तीसाठी १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते.

# एअरटेलचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक उपक्रम

- एअरटेलकडून ३६ कोटी भारतीय ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियम मोफत मिळणार !

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**




भारताची आघाडीची दूरसंचार सेवा पुरवठादार कंपनी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारती एअरटेलने आता आपल्या ग्राहकांसाठी खास सोय उपलब्ध करुन दिली आहे. एअरटेलने ३६ कोटी भारतीय ग्राहकांसाठी अडोबी एक्सप्रेस हे अत्याधुनिक एप आता उपलब्ध केले आहे. अडोबी एप्लिकेशन हे वापरण्यासाठी अतिशय सोप्पे आहे. शिवाय या एप्लिकेशनच्या मदतीने डिजीटल कामही जलदरित्या पूर्ण होते. त्यामुळे सोशल मिडीयाशी संबंधित कोणतेही डिजीटल काम करणे आता सहज शक्य होणार आहे.

भारती एअरटेल आणि अडोबी यांच्यात पहिल्यांदाच या विषयासंदर्भातील ऐतिहासिक करार झाला आहे. या भागीदारीतून एअरटेल आपल्या सर्व ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा मोफत उपलब्ध होणार आहे.

याद्वारे एअरटेलचे ग्राहक सोशल मिडीया पोस्ट, मार्केटिंग संबंधित डिजीटल काम, छोटे व्हिडिओ आणि इतर कोणतेही डिझाइन अत्यंत कमी श्रमात करु शकतील. या एप्लिकेशच्या मदतीने होणारी सर्व कामे उच्च दर्ज्याची असतील. या एप्लिकेशनच्या सबस्क्रिप्शनची मूळ किंमत चार हजार रुपये आहे.

मात्र एअरटेलच्या ग्राहकांसाठी प्रीमियम सबस्क्रिप्शन वर्षभरासाठी मोफत असेल. विविध सोयीसुविधांच्या उपलब्धतेमुळे डिझायनिंगचा कोणताही पूर्वानुभव नसलेल्या ग्राहकांनाही आपल्या कल्पकतेच्या बळावर व्यावसायिक दर्ज्याचे कंटेट तयार करता येतील.

SBI Life
Apne liye. Apno ke liye.

# नवीन व्यवसाय प्रीमियमची नोंद

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाइफ इन्शुरन्सने 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹31,326 कोटींचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे, तर 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या याच कालावधीसाठी हा आकडा ₹26,256 कोटी होता. 31 डिसेंबर, 2024 रोजी संपलेल्या संबंधित कालावधीच्या तुलनेत नियमित प्रीमियममध्ये 15% वाढ झाली आहे. संरक्षणावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून, एसबीआय लाइफचा संरक्षण विभागाचा नवीन व्यवसाय प्रीमियम 31 डिसेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹3,411 कोटी होता.

# अथांग जनसागरात अजितदादा पवार अनंतात विलीन

**बारामती (पुणे) : (समर्थ गांवकरी)**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी बारामती मधील काटेवाडीत विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अथांग जनसागर लोटला होता.अजित पवार यांच्या पार्थिवावर येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी पार्थ आणि जय पवार या दोघा पुत्रांनी त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. अजितदादा यांच्या निधनाने अवघ्या महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. शोकाकुल वातावरणात बारामतीमधील काटेवाडीच्या विद्या प्रतिष्ठान मैदानात अजितदादांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.अजित पवार यांना अखेरचा निरोप देताना पक्षाच्या नेत्यांना अश्रू अनावर झाले, तर राज्यभरातील कार्यकर्त्यांनी शोकमग्न अवस्थेत त्यांना अंतिम निरोप दिला. अजित दादा परत या.... अमर रहे, अमर रहे, अजित पवार अमर रहे.... असं म्हणत कार्यकर्त्यांनी टाहो फोडला. साश्रू नयनांनी अजित दादांना अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी त्यांच्या अंत्यदर्शनाला अफाट जनसागर लोटला होता. महाराष्ट्रासह देशभरातील अनेक नेते अजित पवारांना अखेरचा निरोप देण्यासाठी जमले होते.

यावेळी राजकीय नेत्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत कुणालाही अश्रू आवरता येत नव्हते. अत्यंत शोकाकुल वातावरणात अजित पवारांना शेवटचा निरोप दिला. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी अजितदादा यांच्या पार्थिवाला प्रथम पुष्पचक्र अर्पण करून अखेरची श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ,रक्षा खडसे,माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, आंध्र प्रदेशचे मंत्री नारा लोकेश, माजी खासदार निवेदिता माने, मंत्री गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, राणा जगजितसिंग, उद्योजक नरेश आरोरा, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आदिती तटकरे,अभिनेता रितेश देशमुख, खासदार बजरंग सोनावणे,निलेश लंखे, संजय दिना पाटील, धनंजय मुंडे, नमिता मुंदडा,माणिकराव कोकाटे, सरोज अहिरे,जयदिप कवाडे,अमोल मिटकरी,झिशान सिद्दीकी,सुरज चव्हाण यांच्यासह देशभरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, राज्याच्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्री आमदार खासदार या प्रसंगी उपस्थित होते.

# रयत संकुलाच्यावतीने अजित पवार यांना श्रद्धांजली



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

एका भीषण विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत संकुलाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बाबासाहेब भोस यांच्या संयोजनाने पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. यावेळी बोलताना बबनराव पाचपुते म्हणाले, "अजितदादांसारखा नेता पुन्हा होणे नाही. झटपट निर्णय घेण्याची क्षमता, कार्यकर्त्यांचे योग्य मूल्यमापन आणि त्यांच्यावर असलेले प्रेम ही त्यांची वैशिष्ट्ये होती. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी कार्यमग्न असत."

अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस म्हणाले, "समाजाच्या कल्याणाचा ध्यास असणारा नेता घडण्यासाठी प्रचंड कष्ट लागतात. समाज व जनतेसाठी समर्पित असलेल्या अजित पवार यांच्या अपघाती निधनाने समाजाची मोठी हानी झाली आहे. लाख गेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जाऊ नये," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

भोकरदन विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी अजित पवार यांच्या कार्यातील अनेक आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.

आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, "रयत शिक्षण संस्थेचे रोपटे लावणारे कर्मवीर भाऊराव पाटील महान आहेतच; मात्र त्या रोपट्याचा विशाल वटवृक्ष होण्याच्या प्रवासात अजित पवार यांचे योगदान मोलाचे आहे."

रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अण्णासाहेब शेलार म्हणाले, "अजित पवार हे शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे, शिस्तप्रिय नेते होते. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे नुकसान झाले आहे."

यावेळी कुंडलिकराव दरेकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, प्राचार्य डॉ. महादेव जरे, प्राचार्य दिलीप भुजबळ, मुख्याध्यापिका भोईटे मॅडम, पत्रकार पिटर रणसिंग, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, सचिन झगडे, प्रा. रत्नाकर झिटे आदींनी श्रद्धांजली अर्पण केली. सूत्रसंचालन प्रा, संदीप दरेकर यांनी केले

# काँग्रेस पक्ष सदैव कटिबद्ध

**पुणे/सातारा : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सत्ताधारी 'भाजपधार्जिण्या महायुती' सरकारने १० हजार शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊन गरीब, वंचित आणि ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा डाव रचला आहे. हा निर्णय महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला काळिमा फासणारा असून, याविरोधात सावित्रीच्या लेकी रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारतील, असा इशारा काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी दिला. सातारा येथील पश्चिम महाराष्ट्र शिक्षक काँग्रेसच्या वतीने आयोजित 'नारी शक्तीचा सन्मान – जिजाऊ, सावित्री, रमाई, अहिल्येच्या लेकींचा व जागर संविधानाचा' या कार्यक्रमात ते बोलत होते.

# इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल पुरवठ्यासाठी अकासा एअरसोबत केली लेटर ऑफ इंटेंटवर स्वाक्षरी

**(समर्थ गांवकरी)**



भारतातील अग्रगण्य राष्ट्रीय ऊर्जा कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने विंग्स इंडिया २०२६ दरम्यान भारतातील सर्वात वेगाने वाढणारी विमान कंपनी अकासा एअरसोबत भविष्यात सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल(एसएएफ) पुरवठ्याचा शोध घेण्यासाठी लेटर ऑफ इंटेंट (एलओआय) वर स्वाक्षरी केली. या लेटर ऑफ इंटेंट अंतर्गत, एसएएफच्या संभाव्य पुरवठ्यामार्फत एअरलाइनच्या शाश्वततेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये सहकार्याचा एक आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव आहे. एसएएफ हे हवाई प्रवासातून होणाऱ्या जीवनचक्रातील हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाय आहे आणि विमान वाहतूक क्षेत्राच्या नेट-झिरो उत्सर्जनाच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा आहे.

"हा एलओआय कमी-कार्बन इंधनांचा विस्तार करण्याच्या आणि आमच्या ग्राहकांना त्यांच्या ऊर्जा संक्रमणामध्ये सहाय्य करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे.

इंधन उत्पादन,पुरवठा आणि लॉजिस्टिक्समधील आमच्या तज्ज्ञतेचा लाभ घेत, एसएएफ चा लवकरात लवकर वापर सुरू करण्यासाठी आम्ही अर्थपूर्ण भूमिका बजावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे," असे इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडचे कंट्री हेड (एव्हिएशन बिझनेस) शैलेश धर यांनी सांगितले.

या एलओआय नुसार, दोन्ही कंपन्या संभाव्य एसएएफ पुरवठ्याचे प्रमाण, वितरण स्थळे आणि कालमर्यादा यांचे मूल्यमापन करण्यासोबतच मान्यताप्राप्त शाश्वत कच्चा माल आणि उत्पादन पद्धतींच्या वापरावरही संयुक्तपणे काम करतील.

# भारतीय सेनेचा बर्फावरील हॉकीत विजय



**लेह (लडाख) : (समर्थ गांवकरी)**

खेलो इंडिया विंटर गेम्स (KIWG) 2026 च्या उपांत्य फेरीत यजमान लडाखला 3-2 ने पराभूत करून चंदीगडचा पुरुष आइस-हॉकी संघ चर्चेचा विषय ठरला. प्रजासत्ताक दिनी एनडीएस (NDS) स्टेडियमवर पार पडलेल्या पुरुष गटाच्या आइस-हॉकी फायनलमध्ये, अनुभवी भारतीय सैन्यदलाला आपले सुवर्णपदक टिकवण्यासाठी चंदीगडच्या जिद्दी संघाविरुद्ध आपला पूर्ण अनुभव पणाला लावावा लागला. सैन्यदलाने हा सामना 3-2 अशा फरकाने जिंकला. सामन्याची शेवटची 3 मिनिटे शिल्लक असताना सैन्यदलाने विजयी गोल डागला. लडाख टप्प्यातील या खेळांचा यापेक्षा थरारक शेवट असूच शकला नसता. फिगर आणि आइस-स्केटर्सनी मिळवलेल्या 4 सुवर्णपदकांमुळे हरियाणाने 'क्विग' 2026 च्या लडाख टप्प्यातील सांघिक विजेतेपद पटकावले. लडाख, महाराष्ट्र आणि तेलंगणा या तिन्ही राज्यांनी प्रत्येकी 2 सुवर्णपदके जिंकली, परंतु रौप्य पदकांच्या संख्येमुळे त्यांच्या क्रमवारीत फरक पडला.

# खर्डा परीसरात स्थानिक गुन्हे शाखा व खर्डा पोलीस यांची धडक कारवाई!

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**




जामखेड तालुक्यातील खर्डा परीसरात तरडगाव फटा या ठिकाणी दोन तरुण मोटारसायकलवर गांजा विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने व खर्डा पोलीसांच्या पथकाने संयुक्त कारवाई करित दोन आरोपींन कडुन 9.854 किलोग्रॅम गांजा जप्त करित मोटारसायकलसह साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात अंमली पदार्थाविरुद्ध कठोर लढाई छेडणाऱ्या पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. टास्क फोर्स नोडल अधिकारी पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पो.उप नि अनंत सालगुडे, समीर अभंग, हृदय घोडके, संतोष खैरे, गणेश लबडे, श्यामसुंदर जाधव, मनोज साखरे, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर व चालक महादेव भांड यांनी खर्डा पोलीस स्टेशन हद्दीत माहीती घेतली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुप्त बातमीदाराने हिरो सीडी डिलक्स मोटारसायकल (MH-16-B-2550) वरून तरडगांव फाट्याहून गांजा विक्रीस नेला जात असल्याची माहिती दिली. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. कबाडी यांनी खर्डा पोलीस स्टेशनला याबाबत कळवले. खर्डा पोलीस स्टेशनचे सपोनि उज्वलसिंह राजपुत, संभाजी शेंडे, शेषराव म्हस्के, बाळु खाडे, धनराज बिराजदार व शकिल बेग यांच्यासह संयुक्त पथकाने तरडगांव फाट्यावर सापळा रचला. व आरोपींची मोटारसायकल थांबवुन तपासणी केली. तसेच त्यांचे नावे विचारली असता सचिन नवनाथ गायकवाड वय- 25 वर्षे रा. पिंपरखेड, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर, व सुक्षय उर्फ सोमा सुनिल काळे, वय-23 वर्षे रा. खर्डा, ता. जाखेड, जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगितले.

पोलिसानी तपासणी करित आसताना गोणीतील हिरवट पाने, फुले, बोंडे असलेला 9.854 किलो गांजा मिळाला. सदरचा गांजा आरोपींनी सुभम घुंगरे (रा. माहीजळगांव, ता. कर्जत) याच्याकडून विक्रीस असल्याचे कबूल केले. सध्या घुंगरे हा आरोपी फरार आहे. आरोपींच्या ताब्यातुन 2 लाख 45 हजार 475 रु कि.चा 9.854 कि.ग्रॅम अंमली पदार्थ गांजा, 30 हजार रु कि.चे दोन मोबाईल, एक हजार रु कि.ची रोख रक्कम, सत्तर हजार रु कि. ची एक मोटार सायकल असा एकुण 3 लाख 46 हजार 475 रु कि.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी खर्डा पोलीस स्टेशनला पो.ना श्यामसुंदर जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील आरोपींन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास खर्डा पोलिस हे करित आहेत. सदरची कारवाई सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर व प्रविणचंद लोखंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, कर्जत विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर व खर्डा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्त केलेली आहे. अहिल्यानगर पोलिसांकडून अंमली पदार्थाविरुद्ध 'जीरो टॉलरन्स' धोरण कायम.

# समाजसेवेचा वारसा पुढे नेत डॉ. प्रीतम सोन्या पाटील यांचे उज्वल यश!

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने अभिनंदन!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी अंजुर फाटा येथील थोर समाजसेवक व समाज कल्याण या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धर्मसेवक सोन्या पाटील यांचे चिरंजीव डॉ. प्रीतम सोन्या पाटील यांनी नुकत्याच झालेल्या आरोग्य सेवेच्या शिक्षणात एम.बी. बी.एस. प्रथम श्रेणीने उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आज अनेक ठिकाणी पालक मोठ्या पदावर असल्यानंतर मुले शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात; मात्र डॉ. प्रीतम पाटील यांनी याला अपवाद ठरवत कठोर परिश्रम, शिस्त व सामाजिक जाण ठेवून आपले शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच गोरगरिबांची जाण, सर्वसामान्य जनतेबद्दल आत्मीयता आणि सेवाभाव जपणाऱ्या या कुटुंबातील संस्कारांचा ठसा त्यांच्या यशात स्पष्ट दिसून येतो.

डॉ. प्रीतम यांना वडील डॉ. धर्मसेवक सोन्या पाटील यांचे आशीर्वाद, आईचे भक्कम पाठबळ तसेच चुलते जे. के. पाटील यांची सततची साथ लाभली. या सर्वांच्या प्रेरणेने त्यांनी पाटील परिवाराचे नाव आरोग्य क्षेत्रात उज्वल केले आहे.

पाटील परिवाराची साईबाबांवर दृढ श्रद्धा असून गेल्या २२ वर्षांपासून भिवंडी ते शिर्डी पायी दिंडी आयोजित केली जाते. या दिंडीमध्ये हजारो भाविक सहभागी होतात. या दिंडीचे मार्गदर्शक जे. के. पाटील असून "या दिंडीमध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाला आयुष्यात उभे राहण्याची ताकद मिळावी" हा त्यांचा मुख्य हेतू आहे. हीच परंपरा पुढे नेत या परिवाराने शिक्षण, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.



गेल्या २५–३० वर्षांपासून डॉ. धर्मसेवक सोन्या पाटील यांच्या माध्यमातून मोफत आरोग्य सेवा, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व शालेय साहित्य वाटप असे उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. स्वर्गीय आनंद दिघे साहेबांचे आशीर्वाद पाठीशी असल्याने समाजहितासाठी कार्य करताना त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणालाही प्राधान्य दिले. "माझी मुले भविष्यात समाजासाठीच सेवा देतील" हा त्यांचा संकल्प आज प्रत्यक्षात उतरलेला दिसतो.

डॉ. प्रीतम पाटील यांनी परदेशात शिक्षण घेऊन राज्याचे नाव उंचावले असून त्यांच्या या यशाबद्दल राज्यभरातून अभिनंदन होत आहे.

त्यांच्या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, खासदार सुरेश मात्रे, माजी आमदार रुपेश म्हात्रे, आमदार किसन कथोरे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, ज्येष्ठ पत्रकार किशोर पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभिनंदन व्यक्त केले आहे. समाजसेवेचा वारसा जपत शिक्षण व आरोग्य क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करणाऱ्या डॉ. प्रीतम सोन्या पाटील यांच्या यशामुळे भिवंडी परिसरासह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे.

# आंतरमहाविद्यालयीन क्रीडामहोत्सव 2025–26 चे उत्साहात उद्घाटन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटीच्या शेठ एन.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रीडामहोत्सव 2025–26 चा उद्घाटन समारंभ दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हा क्रीडामहोत्सव २९ व ३० जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्य डॉ. मनोशी बागची यांच्या नेतृत्वाखाली या क्रीडामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिमखान्याचे प्रा. इनचार्ज मनोज गौड व महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका सलोनी बांभीड यांचे विशेष योगदान लाभले. प्राध्यापकवर्ग, क्रीडा समिती आणि विद्यार्थी स्वयंसेवकांचे सहकार्य उल्लेखनीय ठरले. उद्घाटन समारंभासाठी समाजरत्न शेठ नानाजी भाई खिमजी भाई ठक्कर ठाणवाला हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा, शिस्त, संघभावना व आरोग्य यांचे महत्त्व अधोरेखित केले.



Kridamohotsav 2025–26 अंतर्गत Indoor तसेच Outdoor अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून ठाणे व मुंबई विभागातील ३५ पेक्षा अधिक महाविद्यालयांमधील ४३० हून अधिक विद्यार्थ्यांनी या क्रीडामहोत्सवासाठी नोंदणी केली आहे.

पुढील दोन दिवसांत विविध क्रीडाप्रकारांमधून विद्यार्थ्यांना आपली क्रीडाकौशल्ये सादर करण्याची संधी मिळणार आहे. उत्साहपूर्ण वातावरणात आणि खेळाडूवृत्तीच्या संदेशासह क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन समारंभ यशस्वीरीत्या पार पडला.

# पिंपळगाव खांड धरणास 'कै. अजितदादा पवार जलसागर' असे नामकरण करावे



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते कै. अजितदादा पवार यांच्या विमान अपघातातील निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. त्यांच्या जाण्याने विकासाभिमुख, कणखर नेतृत्व हरपल्याची भावना जनमानसात व्यक्त होत आहे. कै. अजितदादा पवार यांचे अकोले तालुक्यावर विशेष प्रेम होते. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या विकासकामांबरोबरच अकोले तालुक्यातील जलसिंचन, शेती व ग्रामीण विकासासाठी त्यांनी भरीव योगदान दिले. त्याचाच एक जिवंत साक्षीदार म्हणजे मुळा विभागासाठी वरदान ठरलेले पिंपळगाव खांड धरण होय. अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सीताराम पाटील गायकर यांच्या विशेष मागणीनुसार कै. अजितदादा पवार यांनी या धरणाकडे स्वतः जातीने लक्ष घालत काही वर्षांतच हे महत्त्वाकांक्षी काम पूर्ण करून घेतले. या धरणामुळे मुळा विभागातील हजारो शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा लाभ झाला असून परिसरातील शेती समृद्ध झाली आहे. परिणामी शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला, हे अजितदादांच्या दूरदृष्टीचे ठळक उदाहरण आहे. या पार्श्वभूमीवर मुळा विभागातील युवक कार्यकर्ते व अगस्ती पतसंस्थेचे संचालक इंजि. निलेश ज्ञानदेव गायकर यांनी पिंपळगाव खांड धरणास "कै. अजितदादा पवार जलसागर" असे नाव देण्याची जोरदार मागणी केली आहे.

या नामकरणामुळे कै. अजितदादा पवार यांनी अकोले तालुक्यासाठी केलेल्या विकासकामांची आठवण कायमस्वरूपी जिवंत राहील. तसेच हीच अकोले तालुक्याच्या वतीने त्यांना दिली जाणारी खरी व अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल, अशी भावना इंजि. निलेश गायकर यांनी व्यक्त केली आहे.



# वेदांत मेटल बाजारात झिंक प्राइस केले लॉंच

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी, जगातील सर्वात मोठे एकात्मिक झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील पाच शीर्ष चांदी उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने त्यांच्या प्रमुख मेटल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, वेदांत मेटल बाजारवर भारतीय रुपयांमध्ये झिंक प्राइस नावाचे लाइव्ह प्राइसिंग मॉड्यूल लाँच करण्याची घोषणा केली. धातूच्या किंमतींच्या प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्यासाठी डिझाइन केलेले.

# वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ (२०२५-२६)

**(समर्थ गांवकरी)**

शेठ , एन. के. टी.टी. ज्युनियर कॉलेज चा वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ २७ जानेवारी २०२६ रोजी रोजी पार पडला. हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे दर्शन घडवणे आणि त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच सह -शालेय यशाचे कौतुक करणे, हा या कार्यक्रमाचा, मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात आदरणीय उपस्थित मान्यवरांच्या स्वागताने झाली, त्यामध्ये खालील व्यक्ती

१) माननीय अध्यक्ष : डॉ. श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला.

मुख्य अतिथी : श्री अभिषेक देशमुख (अभिनेता आणि लेखक)

सन्माननीय अतिथी : ड्रॉ. निकिता कोठारी



(प्राचार्य, इंडो स्कॉइस ग्लोबल स्कूल, ठाणे)

६) माननीय सचिव श्री नटवरलाल विरजीभाई ठक्कर

५) आदरणीय प्राचार्य : श्रीमती लीडिया सालियन

आदी मान्यवर उपस्थित होते

या व्यतिरिक्त शिक्षक, पालक आणि अनेक गुणवंत विदयार्थी उपस्थित होते, ज्यांनी या सुंदर कार्यक्रमात सहभाग घेतला कार्यक्रमाची पुढील वाटचाल राष्ट्रगीत, प्रार्थना गीत आणि दीपप्रज्वलन करून झाली, ज्याद्वारे एका अर्थपूर्ण आणि यशस्वी कार्यक्रमासाठी आशीवाद घेण्यात आले. त्यानंतर कॉलेजच्या व्यांस्कृतिक विभाग प्रमुखांनी सर्वांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.

कार्यक्रमाची संकल्पना "माइंड, मशीन आणि मॅजिक" (Mand, Machine and Magic) अशी होती., जी प्रामुख्यान एआय (A1- कृत्रिम बुद्धिमन्ना) संबंधित संबंधित होती. त्यानंतर, मुख्य अतिथी आणि उपस्थित इतर मान्यवरांचे पुन्हा एकदा स्वागत व सत्कार करण्यात आला.

शाळा आणि महाविद्यालयीन परिषदेच्या सदस्यांनी वार्षिक अहवाल सादर केला, ज्यामध्ये शैक्षणिक कामगिरी, स्पर्धा, क्रीडा क्षेत्रातील यश आणि विदयार्थ्यांच्या विकासासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांचा उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाच्या पुढील भागात आमच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध नृत्यप्रकार आणि विशेषतः इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतील नाटक. करण्यात आली. नाटक सादर करण्यात आली.

त्यानंतर, मुख्य अतिथिंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले , ज्यापाठोपाठ आदरणीय प्राचार्यांचे भाषण झाले तसेच,

माननीय अध्यक्षानी आपल्या प्रेरणादायी साणि शांत भाषणान उपस्थितांना संबोधित केले या सुंदर कार्यक्रमाचा समारोप चालू शैक्षणिक वर्षाच्या पारितोषिक वितरणाने झाला, ज्याची सर्व स्पर्धक आतुरतेने वाट पाहत होते. शेवटी आभार प्रदर्शन,सांस्कृतिक कार्यक्रम आणि वंदे मातरम'ने या प्रदीर्घ आणि सुंदर सोहळ्याची यशस्वी सांगता झाली, आणि कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# ३००० विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत व संचलनातून राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरच्या मैदानावर ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यावेळी चैतन्य विद्यालय ओतूर गाडगे महाराज विद्यालय,सावित्रीबाई फुले विद्यालय ओतूर व श्रीकृष्ण रामजी तांबे इंग्लिश मेडियम स्कूल च्या ३००० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सामूहिक कवायत व संचलनातून राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना दिली. यावेळी समारंभाचे आयोजन ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.अशी माहिती चैतन्य विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. सारे जहा से अच्छा,ये हिंदोस्ता हमारा हमारा ;वंदे मातरम् वंदे मातरम् ; हम सब भारतीय है!कदम कदम बढाये जा खुशी के गीत गाये जा ये जिंदगी है कौम की तू कौम पे लुटाये जा या संगीताच्या तालावर चैतन्य विद्यालय , गाडगे महाराज विद्यालय सावित्री बाई फुले विद्यालय ओतूर व श्रीकृष्ण रामजी तांबे इंग्लिश मेडियम स्कूल च्या ३००० विद्यार्थ्यांनी लयबद्ध व तालबद्ध अशी सुंदर सामूहिक कवायत ,साहित्य कवायत व संचलन याचे सादरीकरण केले.यातून विद्यार्थ्यांनी शिस्त ,संयम , एकाग्रता,राष्ट्रभक्ती,राष्ट्रप्रेम, सार्वभौम एकात्मता याचे दर्शन घडविले. उपस्थित सर्वांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ दिल्याबद्दल माजी विस्तार अधिकारी सुनंदा डुंबरे,जिल्हा स्तरावर कला क्रीडा महोत्सवात विविध स्पर्धांत प्रथम व तृतीया क्रमांक संपादन केल्याबद्दल जिल्हा



परिषद प्राथमिक शाळा ओतूर नंबर १ व २ यांचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच आगरतळा बांग्लादेश बॉर्डर याठिकाणी कार्यरत असाणारे सी आर पी एफ चे हवलदार सचिन पादीर व संचलना साठी गाडी दिल्याबद्दल संतोष मांडे यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्वांना संदेशाचे वाचन व अध्यक्षांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना भाऊसाहेब खाडे म्हणाले की ,देश प्रेम शब्दात नाही कृतीत दिसायला हवं.स्वातंत्र्य केवळ अधिकारात नाही कर्तव्यात जपायला हवं. ज्या क्रांतिकारकांनी महापुरुषांनी देश स्वतंत्र प्राप्तीसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांचे स्मरण आपण कायम करायला हवे.आपल्या संविधानाबद्दल प्रत्येकाने आदर ठेवायला हवा. प्रजासत्ताक दिन हा आपल्या संविधानाचा आणि लोकशाहीचा उत्सव आहे.आईने बाळाची शेतकऱ्यांनी शेताची,सैनिकांनी सीमांची,शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व राज्यकर्त्यांनी सर्वसामान्य माणसांची काळजी घेतली तर भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या कार्यक्रमास ग्राम विकास मंडळ ओतूर चे अध्यक्ष अनिल तांबे,ओतूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक लहुजी थाटे,सीआरपीएफ हवालदार सचिन पादीर,प्रभाकर तांबे,रघुनाथ तांबे,वैभव तांबे, नितीन पाटील,राजेंद्र डुंबरे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप , छाया तांबे,भानूविलास गाढवे,आत्माराम गाढवे,पोपट नलावडे,प्रशांत डुंबरे,महेंद्र पानसरे,मनिषा साठे,राजश्री भालेकर,बशीर शेख,संपत माने,संजय हिरे,अनिल उकिरडे,कोंडीभाऊ काळे,शांताराम पानसरे,अशोक अहिनवे,सीमा डुंबरे,नितीन तांबे,जितेंद्र डुंबरे,रविंद्र डुंबरे,सचिन घोलप बहुसंख्येने ग्रामस्थ पालक विद्यार्थी व सर्व शाळांचे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शोभा तांबे व सूत्रसंचालन संतोष कांबळे व अमित झरेकर यांनी केले.

# जोटून इंडियाने सुरु केले आहे जोटाशील्ड इटरना

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जगात पेंट आणि कोटिंग्ज उद्योगात आघाडीवर असलेल्या संस्थेचे स्थानिक अंग असणाऱ्या जोटून इंडियाने आज जोटाशील्ड इटरनाच्या उद्‌घाटनाची घोषणा केली, जे तिच्या प्रिमियम एक्स्टिरिअर पेंट पोर्टफोलिओमधील एक क्रांतिकारी अभिनव उत्पादन आहे. भरवशाच्या जोटाशील्ड छत्राखाली सर्वोच्च गुणवत्ता देणारे इटरना एक्स्टिरिअर पेंट संदर्भातील रंग उडून जाणे, धूळ साचणे ते पावसाच्या पाण्यामुळे डाग पडणे अशा मुख्य आव्हानांवर तोडगा काढते; यासाठी ते एका प्रगत स्वयं-स्वच्छताकारी वैशिष्ट्याचा वापर करते ज्यामुळे भिंती दीर्घकाळ नव्याने रंगवल्यासारख्या दिसत राहतात.




जोटूनच्या संशोधन व विकास (आर अँड डी) टीम्सकडून घडवण्यात आलेले जोटाशील्ड इटरना प्रगत स्वयं-स्वच्छताकारी तंत्रज्ञान, श्रेष्ठ बाइंडर यंत्रणा आणि बदलत्या हवामानात स्थिर राहणाऱ्या रंगांचा मेळ साधून दीर्घकाळ टिकणारे संरक्षण आणि सौंदर्य पुरवते, अगदी भारतातील आव्हानात्मक हवामानातील परिस्थितींमध्येसुद्धा. स्मूद फिनिश असणारे जोटाशील्ड इटरना पेंट फिल्ममधून धूळ आत शिरू देत नाही, जी समस्या पारंपरिक पेंट्स उष्णतेमुळे आणि आर्द्रतेमुळे मऊ झाल्यावर सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. याच्या स्वयं-स्वच्छताकारी गुणधर्मांमुळे धूळ पावसात निघून जाते, आणि पावसाच्या पाण्याच्या ओघोळांमुळे डागही पडत नाहीत, ज्यामुळे बाहेरच्या भिंती जास्त काळ स्वच्छ आणि उजळ राहतात. 500 रंगांमध्ये उपलब्ध असणारे इटरना त्यामधील क्रियाशील संरक्षक पदार्थांसह (ॲडिटिव्ह्जसह) रंगांची अतुलनीय कामगिरी दाखवते जे अतिनील किरणांशी दीर्घकाळ संपर्क आल्याने उत्पन्न होणाऱ्या फ्री रॅडिकल्सवर मात करून पेंट जुने दिसण्याच्या प्रक्रियेचा वेग मंदावते. या उत्पादनावर प्रचंड चाचण्या झालेल्या असून जागतिक त्रयस्थ प्रयोगशाळांकडून त्याला 21 गुणवत्ता आश्वासन प्रमाणपत्रे मिळालेली आहेत, ज्यांमध्ये सीओ2, विसरण, क्यूयूवी मुळे जलद गतीने होणारी झीज, पाणी आत झिरपणे, क्षार फवारणीचा प्रतिकार, या चाचण्यांचाही समावेश होतो.

# कीटकजन्य आजारांविरोधात भव्य जनजागृती चित्ररथ मोहीम

## प्रजासत्ताक दिनी ठाणे जिल्ह्यात आरोग्य विभागातर्फे 'मच्छर ला टक्कर' अभियानाची सुरुवात




**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभमुहूर्तावर ठाणे जिल्हा आरोग्य विभागामार्फत 'मच्छर ला टक्कर' या कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली. ही मोहीम जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, ठाणे व Godrej Embed – FHI संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ जिल्हा पोलीस आयुक्तालयाच्या मैदानात उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक डॉ. अशोक नंदापूरकर, सहाय्यक संचालक डॉ. मनीष रेंघे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या सूचनेनुसार जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांनी या भव्य जनजागृती चित्ररथ मोहिमेची सुरुवात केली.

या प्रसंगी चार भव्य व जनजागृतीपर चित्ररथांचे उद्घाटन करण्यात आले. हे चित्ररथ संपूर्ण ठाणे शहरात फिरविण्यात येणार असून, नागरिकांमध्ये हिवताप (मलेरिया), डेंग्यू, चिकुनगुनिया यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत जागृती निर्माण करण्याचे कार्य करणार आहेत.

गतवर्षी ठाणे जिल्ह्यात हिवतापाचे २,०७३ रुग्ण, डेंग्यूचे १,०९३ रुग्ण तसेच चिकुनगुनियाचे १६८ रुग्ण आढळून आले होते. सध्याच्या काळात हे कीटकजन्य आजार नागरी आरोग्यासाठी गंभीर आव्हान ठरत असून, त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अत्यंत आवश्यक आहेत.

या चित्ररथ मोहिमेच्या माध्यमातून डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी घ्यावयाची काळजी, घरगुती व परिसरातील स्वच्छता, साचलेल्या पाण्याचे व्यवस्थापन, वैयक्तिक प्रतिबंधात्मक उपाय याबाबतची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे कीटकजन्य आजारांवर मात करण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास जिल्हा आरोग्य यंत्रणेने व्यक्त केला आहे.

